सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. ०५ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३२ | अंक २९९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### उप्रमध्ये गारांचा पाऊस होणार ?

**नवी दिल्ली :** दिल्ली-एनसीआरमध्ये हिवाळा परतला आहे. पर्वतांवरील बर्फ वितळत आहे आणि पश्र्चिमी विक्षोभाचा प्रभाव असल्याने उत्तर भारतातील मैदानी भागात थंड वारे वाहत आहे. हवामान खात्याच्या मते, दिल्लीत थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता आहे, दाट धुके पडण्याची शक्यता आहे. सकाळी आणि रात्री उशिरा थंडी अधिक तीव्रतेने जाण-वेल.हवामान खात्याने म्हटले आहे की, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि बिहारसह उत्तर भारतातील बहुतेक भागांवर थंडीच्या लाटा येतील. धुक्यामुळे अनेक भागात दृश्यमानता कमी होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशा-तील किमान २५ जिल्ह्यात गारांच्या पावसाची शक्यता असल्याचेही हवामान विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### वैद्यकीय महाविद्यालयासाठी जागा मंजूर

**मुंबई :** अमरावती जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्न रुग्णालयाच्या उभारणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे, अमरावती जवळील आलियाबाद येथील ११.२९ हेक्टर जमिनीचा अंतिम ताबा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे सोपवण्यास महसूल विभागाने मंजुरी दिली. याबाबतचा निर्णय बुधवारी जारी करण्यात आला आहे.या जागेवर १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारले जाईल. या महाविद्यालयाला संलग्न ४३० रुग्णखाटांचे अद्ययावत रुग्णालय स्थापन करण्यात येणार आहे.

### काँग्रेसमधील वाद चव्हाट्यावर

**नवी दिल्ली :** चंद्रपूर महापालिकेत सर्वाधिक जागा जिंकूनही काँग्रेसमध्ये गटातील राजकारणामुळे सत्ता गमावण्याची वेळ आली आहे. काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील वाद शिगेला पेटला. अखेर नगरसेवकांना घेऊन वडेड्डीवार दिल्लीत दाखल झाले. पक्षश्रेष्ठींशी चर्चा केल्यानंतर वाद निवळला असल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, या वादाच्या निमित्ताने स्थानिक नगरसेवकांची दिल्लीवारी झाली आहे.

### ममतांची सर्वोच्च न्यायालयात धाव

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये मतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणी अर्थात डखठ च्या प्रक्रियेला विरोध केला जातोय. पश्र्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या प्रक्रियेविरोधात थेट उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ममता बॅनर्जी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर आज (४ फेब्रुवारी) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी घेण्यात आली. यावेळी बॅनर्जी यांनी स्वत: आपली बाजू मांडली. पश्र्चिम बंगालमध्ये मतदारांची नावे मतदार यादीतून काढून टाकली जात आ-हेत. पश्र्चिम बंगालला टार्गेट केलं जातंय. त्यामुळे आम्हाला न्याय द्या, अशी विनंती सर्वोच्च न्यायालयाला केली. विशेष म्हणजे सर्वोच्च न्यायालयानेही थेट निडवणूक आोयगाला नोटीस बजावली असून उत्तर मागितले आहे. आता या प्रकरणावर ९ फेब्रवारी रोजी पुढील सुनावणी होईल.

### रशियाची भारताला ऑफर

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि भारतामध्ये ट्रेड डीलची घोषणा झाली आहे, मात्र अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प हे वारंवार अशी मागणी करत आहेत, की भारतानं रशियाकडून तेलाची खरेदी करू नये, त्याऐवजी त्यांनी व्हेनेझुएलाकडून तेलाची खरेदी करावी, मात्र भारतानं याबाबत आधीच आपली भूमिका स्पष्ट केली आहे, ज्या देशांवर प्रतिबंध आहे, अशा देशांकडून आम्ही तेलाची खरेदी करणार नाही, अमेरिकेनं भार-तावर भारत रशियाकडून तेलाची खरेदी करतो म्हणून २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लावला होता, तो टॅरिफ आता या ट्रेड डीलसोबतच हटवण्यात आला आहे. अमेरिकेनं भारतावर टॅरिफ लावला होता, त्यामुळे या काळात रशिया आणि भारताची जवळीक चांगलीच वाढल्याचं पहायला मिळालं, दरम्यान अमेरिकेनं टॅरिफ हटवण्याची घोषणा करताच आता रशियानं देखील भारतासाठी सर्वात मोठी घोषणा केली आहे, अशा परिस्थितीमध्ये आता भारत काय निर्णय घेणार हे पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे?

### वर्ल्ड कप नावामागचे लॉजिक ?

**नवी दिल्ली :** आयसीसीने टी२० वर्ल्डकप स्पर्धेला २००७ पासून सुरुवात केली. या स्पर्धेचं पहिलं पर्व हे दक्षिण अफ्रिकेत पार पडलं आणि भारताने जेतेपदावर नाव कोरलं. पण या टी२० वर्ल्डकप स्पर्धेचं नाव तेव्हा 'वर्ल्ड टी-२०' असं होतं. काही पर्व याच नावासह गाजली. पण २०20 मध्ये या स्पर्धेचं नाव बदललं गेलं. पुरूष आणि महिला या दोन्ही टी२० स्पर्धेच्या नावात आयसीसीकडून बदल करण्यात आला. पण नाव बदलून काय मिळालं? असा निर्णय घेण्याचं कारण काय? वगैरे अनेक प्रश्न्न तेव्हा उपस्थित केले गेले होते. काळाच्या ओघात नाव बदलल्याची चर्चाही संपली. आता टी२० वर्ल्डकप स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

# राहुल गांधींची वक्तव्ये देशहिताला धक्का पोहोचवणारी : फडणवीस

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०४ फेब्रुवारी :** काँग्रेस नेते राहुल गांधी हे गंभीर आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांवर तथ्याधारित चर्चा करण्याऐवजी सातत्याने आरोपांचे राजकारण करत असून, देश, सेना आणि शहिदांना बदनाम करण्यातच त्यांना रस असल्याचा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. देशाच्या सुरक्षिततेशी आणि प्रतिष्ठेशी संबंधित मुद्द्यांवर जबाबदार भूमिका अपेक्षित असताना राहुल गांधींची वक्तव्ये देशहिताला धक्का पोहोचवणारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राहुल गांधी यांना सभागृहात चर्चा करायची नसून केवळ खोटे आरोप करायचे आहेत. अशा प्रकारची वक्तव्ये जबाबदार नेतृत्वाला साजेशी नाहीत. देश आणि सेनेविषयी वक्तव्य करताना आवश्यक ते गांभीर्य आणि



संवेदनशीलता दाखवली जात नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, राज्यातील लाडकी बहीण योजनेला अजित पवार यांचे नाव देण्याच्या मागणी-वर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पहिल्यांदाच स्पष्ट भूमिका मांडली. या विषयावर विविध स्तरांतून मागण्या येत असल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र कोणताही निर्णय घाईघाईने न घेता सर्व बाबींचा सखोल विचार करूनच अंतिम निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले. लाडकी बहीण योजना ही राज्यातील महिलांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना असून, तिच्याशी संबंधित कोणताही बदल चर्चेतून



आणि सामूहिक निर्णयातूनच केला जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. योजनेला कोणाचे नाव द्यावे, यापेक्षा तिचा लाभ महिलांपर्यंत प्रभावीपणे पोहा-चतो आहे की नाही, हा खरा मुद्दा असल्याचे त्यांनी नमूद केले. एकीकडे सरकार लाडकी बहीण योजनेसारख्या सामाजिक योजनांबाबत संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने निर्णय घेण्याच्या भूमिकेत आहे, तर दुसरीकडे विरोधकांकडून केवळ आरोपांचे राजकारण सुरू असल्याचा अप्रत्यक्ष टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी लगावला.

## पाकिस्तानला मोठा दणका, ४० टक्के भूभाग हातातून निसटला?

### पाकच्या संरक्षण मंत्र्यांची थेट संसदेमध्ये कबुली

**इस्लामाबाद/वृत्तसंस्था :** ऑपरेशन सिंदूरनंतर आम्ही भारतासोबत लढण्यास तयार आहोत, आम्ही प्रत्युत्तर देऊ असे मोठ मोठे दावे करणाऱ्या पाकिस्तानची खरी स्थिती अखेर आता जगासमोर आली आहे. बलोच बंडखोरांनी पाकिस्तानच्या सरकारला जेरीस आणलं आहे. बलोच बंडखोरांसमोर पाकिस्तानी सैनिक हतबल झाले आहेत. बलोच बंडखोरांकडून बलुचिस्तानमध्ये सुरू असलेल्या पाकिस्तानी सैनिकांसोबतच्या संघर्षाचे व्हिडीओ देखील सोशल मीडियावर पोस्ट केले जात आहेत, ज्यामध्ये बलुचिस्तानमधून पाकिस्तानी सैन्य माघार घेताना दिसत आहे. परिस्थिती एवढी बिकट बनली आहे, की आता खुद्द पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांनी देखील पाकिस्तानचा ४० टक्के भाग आमच्या हातून निसटल्याचं संसदेमध्ये कबूल केलं आहे.

बलोच बंडखोरांनी पाकिस्तानच्या नाकात दम केला आहे, पाकिस्तानचं सरकार हातबल झालं आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी संसदेमध्ये माहिती देताना म्हटलं आहे की, बलुचिस्तानमधल्या विशाल भौगोलिक परिस्थितीमुळे तिथे तैनात करण्यात आलेल्या सौनिकांना या बंडाचा बिमोड करण्यात यश मिळत नाहीये, परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आहे. बंडखोरांचा आमच्यावर प्रचंड दबाव आहे, बलुच लिबरेशन आर्मी आता केवळ फक्त एक बंडखोरांची टोळी राहिली नसून, त्यांचं एक जबरदस्त नेटवर्क तयार झालं आहे. त्यांच्याकडे वीस लाख रुपयांच्या रायफल्स आहेत, आमच्याकडे नाहीयेत, त्यांच्याकडे अत्याधुनिक शस्त्र आहेत, ते पण आमच्याकडे नाहीयेत, असं पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यानं म्हटलं आहे.

पुढे बोलताना त्यांनी असं देखील म्हटलं आहे की, बलुचिस्तानचं क्षेत्रफळ हे फार मोठं आहे. पाकिस्तानच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४० टक्के क्षेत्रफळ हे एकट्या बलुचिस्तामध्ये आहे. मोठं क्षेत्रफळ आणि भौगोलिक प्रतिकूल परिस्थितीमुळे या आघाडीवर आम्हाला अपयश येत असल्याचं पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यानं म्हटलं आहे. पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्याचं हे वक्तव्य पाकिस्तानची हतबलता दाखवत आहे.

## एक्सप्रेवेवर प्रचंड मोठी वाहतूक कोंडी अन् २५ किलोमीटर पर्यंत रांगा

**तभा वृत्तसेवा**

**लोणावळा, दि. ०४ फेब्रुवारी :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मंगळवारी सायंकाळी घडलेल्या एका अपघातामुळे संपूर्ण मार्गावर वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. आडोशी बोगद्याच्या परिसरात ज्वलनशील वायूची वाहतूक करणारा टँकर उलटल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव महामार्गावरील वाहतूक दीर्घकाळासाठी थांबवावी लागली. या घटनेचा परिणाम म्हणून महामार्गावर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, अनेक प्रवासी अनेक तास अडकून पडले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जाणारा हा टँकर एका तीव्र वळणावर चालकाच्या नियंत्रणाबाहेर गेला आणि बोगद्याच्या प्रवेशाजवळ पलटी झाला. टँकरमध्ये असलेल्या वायूची गळती सुरू झाली. संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने खबरदारीचा उपाय म्हणून मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे रोखली, तर पुण्याकडील वाहतूकही मर्यादित स्वरूपात चालू ठेवण्यात आली.अपघातानंतर सुमारे आठ तास महामार्गावर वाहतूक पूर्णतः ठप्प होती. मध्यरात्रीनंतर धोका काही प्रमाणात कमी झाल्यानंतर टँकर बाजूला घेण्यात आला आणि एका लेनवरून वाहतूक सुरू करण्यात आली.

## शिंदेंनी आपल्या सहकाऱ्यांना समज द्यावी : गिरीष महाजन

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०४ फेब्रुवारी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार सुहास बाबर यांनी जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एकेरी उल्लेख केला. तसेच त्यांनी मुख्यमंत्र्यांचा उल्लेख करत भाजपच्या नेत्यांवर निशाणा साधला. त्यांची ही टीका भाजपला चांगलीच जिव्हारी लागली आहे. मंत्री गिरीश महाजन यांनी सुहास बाबर यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं आहे. सुहास बाबर यांनी मुख्यमंत्र्यांचा एकेरी उल्लेख करणं चुकीचं आहे, असं गिरीश महाजन यांनी म्हटलं. तसेच सुहास बाबर यांच्या भाषेवरुन एकनाथ शिंदे यांनी त्यांना समज द्यावी, अशी भूमिका गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे. तसेच आपली पहिली टर्म आहे, ती शेवटची ठरु नये, असादेखील इशारा गिरीश महाजन यांनी सुहास बाबर यांना दिला आहे.



मी आताच वृत्तवाहिनीवर बघितलं. सुहास बाबर ज्या भाषेत बोलत आहेत, ही त्यांची पहिलीच टर्म आहे. शिवसेना नेते अनिल बाबर हे माझे चांगले मित्र होते. गेल्या ३५ वर्षांपासून मी सदनात आहे आणि ते सुद्धा अनेक वर्षांपासून निवडून आले होते. पण त्यांचे चिरंजीव सुहास बाबर ज्या भाषेत बोलत आहेत ते पाहून आश्र्चर्य वाटलं. मुख्यमंत्र्यांबाबत एकेरी भाषेत बोलले आहेत. मला वाटतं अजून त्यांची पहिलीच टर्म आहे. त्यावर ते असं म्हणत आहेत की, तेच सर्व पक्ष चालवत आहेत. सर्व पक्ष माझ्या खिशात आहे, असं त्यांचं म्हणणं अतिशय चुकीचं आहे, अशी भूमिका गिरीश महाजन यांनी मांडली.

ते मुख्यमंत्र्यांवर एकेरी भाषेत बोलत आहेत हे अतिशय गंभीर आहे. त्यांच्या राजकारणाची अजून सुरुवात आहे. ते वर्ष-दीड वर्ष भरापूर्वी निवडून आले आहेत. त्यांनी तोलूनमापून बोललं पाहिजे. त्यांना काय बोल-ावं? ते लहान आहेत, नवीन आहेत. पण मला वाटतं की, त्यांनी थोडं राजकारण समजून घ्यावं. अनिल बाबर देखील आमच्या बरोबर होते. पण त्यांचा कधीच असा तोल गेला नाही ते मी आजपर्यंत बघितलं आहे, असं गिरीश महाजन म्हणाले.

## ३१ मार्च बँक सुरु राहणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०४ फेब्रुवारी :** आर्थिक वर्ष २०२५-२६ चा शेवटचा दिवस असलेल्या ३१ मार्च २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी असली तरी सरकारी व्यवहारांवर कोणताही परिणाम होऊ नये, यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्या दिवशी सरकारशी संबंधित बँकिंग सेवा सुरू ठेवण्याचे निर्देश ठइख कडून देण्यात आले आहेत.

रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या अधिकृत परिपत्रकानुसार, केंद्र आणि राज्य सरकारांच्या वतीने व्यवहार करणाऱ्या बँकांच्या (राष्ट्रीयकृत बँका अर्थात नॅशनलाइज्ड बँका) शाखा ३१ मार्च रोजी सामान्य नागरिकांसाठी खुल्या राहणार आहेत. या निर्णयामुळे वित्तीय वर्ष संपताना होणारे सरकारी आर्थिक व्यवहार वेळेत पूर्ण करता येणार आहेत.

RBI ने स्पष्ट केले आहे की, भारत सरकारच्या विनंतीनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. कारण वित्तीय वर्षाच्या अखेरच्या दिवशी कर संकलन, शासकीय देयके, अनुदान वितरण, विभागीय हस्तांतरणे तसेच इतर आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणावर होतात. अशा वेळी बँक सेवा बंद राहिल्यास लेखाजोखा आणि सेटलमेंट प्रक्रियेत अडथळे येऊ शकतात.

या निर्णयानुसार, कर भरणे, चालान जमा करणे, सरकारी खात्यांशी संबंधित पेमेंट्स तसेच इतर शासकीय बँकिंग सेवा ३१ मार्च रोजी उपलब्ध राहतील. त्यामुळे करदाते, व्यापारी, उद्योग आणि सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' श्री महंत भारतभूषणदासजी महाराज यांना जाहीर



**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. ०४ फेब्रुवारी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीतर्फे दिला जाणारा यंदाचा 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' शेतीभूषण श्रीरंग देवबा लाड (दादा लाड) आणि वाराणसी येथील आचार्य श्री महंत भारतभूषणदासजी महाराज यांना जाहीर झाला आहे. पुण्यात शनिवारी, १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता सिम्बायोसिस, विमाननगर येथील एसव्हीसी सभागृहात आयोजित समारंभात पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

संघाचे द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर (श्रीगुरुजी) यांच्या जयंतीनिमित्त हा पुरस्कार दरवर्षी दिला जा-तो. यंदा या राष्ट्रीय पुरस्काराचे ३१ वे वर्ष आहे. जनकल्याण समितीचे कार्यवाह राजन गोर्हे यांनी पत्रकार परिषदेत पुरस्कारांची अधिकृत घोषणा केली. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. संशोधन क्षेत्रातील योगदानाबद्दल दादा लाड, तर समाजप्रबोधन क्षेत्रातील कार्यासाठी भारतभूषणदासजी महाराज यांचा सन्मान होणार आहे.

दादा लाड यांनी कापूस उत्पादनवाढीसाठी केलेले तंत्रज्ञानाधारित संशोधन विशेष उल्लेखनीय असून त्यांच्या संशोधनाला भारतीय कृषी संशोधन परिषदेकडून मान्यता मिळाली आहे. ज्वारी, गहू, सोयाबीन व तूर उत्पादनवाढ तसेच लाल कंधारी देशी गायींचा प्रसार यामध्येही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

भारतभूषणदासजी महाराज गेली अनेक वर्षे उत्तर प्रदेश, छत्तीसगड, मध्य प्रदेश, झारखंड, ओरिसा, राजस्थान, गुजरात, पंजाब, हरियाणा व दिल्ली आदी राज्यांत संत गुरु रविदास यांच्या विचारांद्वारे समाजप्रबोधन, सामाजिक ऐक्य आणि कुरीती निर्मूलनाचे कार्य सातत्याने राबवत आहेत.

समारंभास उद्योगपती डॉ. अभय फिरोदिया प्रमुख पाहुणे, तर संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेयजी होसबाळे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. संस्थेचे सहकार्यवाह मुकुल पाटगावकर यांनी प्रास्ताविक केले. विनायक डंबीर व प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री यांची उपस्थिती होती.

जनकल्याण समिती महाराष्ट्रात आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण, पूर्वांचल विकास आणि दिव्यांग कल्याण या पाच क्षेत्रांत १७ सेवा प्रकल्प राबवते. यात वसतिगृह, रुग्णालय, रक्तकेंद्र, समुपदेशन सेवा, सेरेब्रल पाल्सी केंद्र, सिकल सेल व थॅलेसेमिया प्रकल्प तसेच दिव्यांग पुनर्वसन उपक्रमांचा समावेश आहे.




## थोडक्यात...

### ‘तुम से तुम तक’मध्ये ट्विस्ट; निहारिकाची प्रतिक्रिया

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील ‘तुम से तुम तक’ मालिकेत आर्यच्या काश्मीरमधील भव्य प्रपोजलला अनुने नकार दिल्याने कथानकात मोठे वळण आले आहे. या सीननंतर सोशल मीडियावर चाहत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून चर्चेला उधाण आले आहे.

यावर निहारिका चौक्सी म्हणाली की, प्रेक्षकांच्या भावना तिला समजतात; मात्र अनुच्या निर्णयामागे कथानकातील महत्त्वाची कारणे आहेत. पुढील भागांत संघर्ष, भावनिक घडामोडी आणि रंजक वळणे दिसतील, त्यामुळे प्रेक्षकांनी धीर ठेवावा, असे तिने सांगितले.

‘तुम से तुम तक’ मालिका दररोज रात्री ८.३० वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.

### ‘भारत रणभूमी दर्शन’साठी अधिकृत मोबिलिटी भागीदार

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने भारताच्या लष्करी परंपरा, शौर्य आणि एकतेच्या चिरंतन भावनेला अभिवादन करणाऱ्या ‘भारत रणभूमी दर्शन’ या राष्ट्रीय मोहिमेसाठी भारतीय सशस्त्र दलांसोबत अधिकृत मोबिलिटी भागीदार म्हणून भागीदारी केली आहे. या सहकार्याद्वारे टीकेएम ने राष्ट्राप्रती आपली दृढ बांधिलकी पुन्हा अधोरेखित करत सशस्त्र दलांच्या धैर्य, जिद्द आणि बलिदानाला सलाम केला आहे. या मोहिमेचा औपचारिक शुभारंभ तेलंगणाचे माननीय राज्यपाल श्री जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते भारतीय सैन्य, भारतीय नौदल, सीमा सुरक्षा दल (बीएसएफ), नागरी प्रशासन आणि टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

### आयडीएफसी फर्स्ट बँक ५०३ कोटी रुपयांचा निव्वळ नफा

**पुणे :** आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत, ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या कालावधीसाठीच्या अलेखापरीक्षित आर्थिक निकालांना मंजुरी दिली. निकालांवर भाष्य करताना बँकेचे एमडी आणि सीईओ श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले की, आमच्या कर्ज वितरण, ठेवी, वेल्थ मॅनेजमेंट, ट्रान्झॅक्शन बँकिंग यांसारख्या सर्व प्रमुख व्यवसायांमध्ये आम्हाला व्यवसायाची मजबूत गती दिसून येत आहे. ३१ डिसेंबर २०२५ अखेर एकूण अनुत्पादित कर्ज (जीएनपीए) १.६९% आणि निव्वळ अनुत्पादित कर्ज (एनपीए) ०.५३% वर आल्यामुळे आमच्या मालमत्तेच्या गुणवत्तेत सुधारणा झाली आहे.

### लाकूड प्रक्रिया व फर्निचर उत्पादनातून भारताच्या विकासाला नवी चालना

**मुंबई :** २६ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ दरम्यान बंगळुरू येथील बेंगळुरू इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटर येथेइंडियावुड २०२६ या जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. न्युर्नबर्गमेस्से इंडिया यांच्या वतीने आयोजित होणाऱ्या या द्वैवार्षिक प्रदर्शनाची ही २६ वी आवृत्ती असून, लाकूड प्रक्रिया, फर्निचर उत्पादन व मॅट्रेस निर्मिती क्षेत्रातील एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद म्हणून इंडियावुड ओळखली जाते. या प्रदर्शनाला युरोपियन फेडरेशन ऑफ वुडवर्किंग मशिनरी मॅन्युफॅक्चरर्स यांचे अधिकृत पाठबळ आहे.

### बेकायदेशीर रसायनांचा वापर केल्यामुळे बंदी

**मुंबई :** भारतामध्ये घरगुती कीटकनाशकांच्या सुरक्षित वापरास प्रोत्साहन देणाऱ्या ना-नफा तत्वावरील उद्योग मंडळ होम इन्सेक्ट कंट्रोल असोसिएशन (क्खउ-) तर्फे बेकायदेशीर डास प्रतिबंधक अगरबत्ती ‘कॉम्फर्ट’ विरोधात महाराष्ट्र सरकारने केलेल्या कारवाईचे स्वागत करण्यात आले आहे. ‘कॉम्फर्ट’ ही डास प्रतिबंधक अगरबत्ती महाराष्ट्र, तमिळनाडू, उत्तर प्रदेश आणि दिल्ली येथे विक्रीस उपलब्ध असून ती मेसर्स धूप छांव कंपनी यांचे उत्पादन आहे. खुल्या बाजारातून गोळा करण्यात आलेल्या नमुन्यांवरून हे उत्पादन अनभिज्ञ ग्राहकांकडून खरेदी केले जात असल्याचे स्पष्ट झाले असून, महाराष्ट्र कृषी विभागाने केलेल्या प्रयोगशाळा चाचण्यांमध्ये ‘कॉम्फर्ट’ मध्ये बेकायदेशीर आणि मान्यता नसलेले रसायन डाइमफ्लुथ्रिन आढळून आले आहे. ‘कॉम्फर्ट’ अगरबत्त्या मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक तसेच उर्वरित संपूर्ण महाराष्ट्रात विक्रीस असल्याचे सांगितले जाते.

### कोल्डस्टार लॉजिस्टिक्स महाराष्ट्रात आपला ठसा वाढवत आहे

**पुणे :** भारतातील सर्वात वेगाने वाढणारी तापमान-नियंत्रित पुरवठा साखळी समाधान प्रदाता, कोल्डस्टार लॉजिस्टिक्सने पुण्यात आपली दुसरी अत्याधुनिक कोल्डसाखळी सुविधा उघडली आहे. यामुळे महाराष्ट्रात प्रक्रिया आणि प्रक्रियेसह एफएमसीजी आणि फळे आणि भाज्यांच्या उत्पादन आणि वितरणावर कंपनीचे लक्ष आणखी मजबूत होईल. चाकण फेज खख मध्ये स्थित, २,२०,००० चौरस फूट तापमान-नियंत्रित गोदाम जलद गतीने वाढणारी पुणे उपभोग बाजारपेठ आणि विश्र्वसनीय शीतगृह आणि प्रक्रिया पायाभूत सुविधांची वाढती प्रादेशिक मागणी पूर्ण करण्यासाठी बांधण्यात आले. या सुविधेची दैनिक प्रक्रिया क्षमता ३००,०००+ युनिट्स आहे आणि ती पुणे आणि आसपासच्या अंतर्गत महाराष्ट्रासाठी एक मध्यवर्ती केंद्र म्हणून काम करते, ज्यामुळे तापमान-संवेदनशील वस्तूंची जलद आणि अधिक कार्यक्षम वाहतूक शक्य होते.

### कोर्टरूम ड्रामा ‘अमर विश्वास’चा ट्रेलर प्रसिद्ध

**नाशिक :** भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयर’ने आज सत्ता, गुन्हेगारी आणि न्यायाचे पदर असलेला, कथानकाला गहनता लाभलेला मनोरंजक कोर्टरूम ड्रामा ‘अमर विश्वास’ या आगामी ओरिजनल सिरीजच्या ट्रेलरचे अनावरण केले.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कर्मचाऱ्यांचा

# राज्यव्यापी बेमुदत लढा; ‘चला मुंबई’चा नारा

**तभा वृत्तसेवा/संतोष करपे**

**खुलताबाद, दि. ०४ फेब्रुवारी :** खुलताबाद महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) योजने अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्रभर राज्यव्यापी बेमुदत आंदोलनाला सुरुवात करण्यात आली आहे. चला मुंबईचा निर्धार करत मनरेगा कर्मचाऱ्यांनी टप्प्याटप्प्याने तीव्र आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केला असून, मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा ठाम इशारा देण्यात आला आहे.



मनरेगा अंतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना इतर शासकीय योजनांतील कर्मचाऱ्यांप्रमाणे शासन सेवेत नियमित/समायोजित करण्यात यावे, ही प्रमुख मागणी आंदोलनाच्या केंद्रस्थानी आहे. अनेक वर्षांपासून मनरेगामध्ये कार्यरत असूनही कर्मचाऱ्यांना अस्थिर रोजगार, अपुरी सेवा-सुरक्षा व अनिश्र्चित भवितव्याचा सामना करावा लागत असल्याने शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

यासोबतच मनरेगा अंतर्गत ड-२ खपर्षेशलह कंपनीमार्फत सुरू असलेली अनधिकृत व अवैध भरती प्रक्रिया तात्काळ थांबवावी तसेच सदर कंपनी रद्द करून सर्व कर्मचाऱ्यांना ‘राज्य निधी असोसिएशन (सोसायटी)’मार्फत नियुक्ती द्यावी, अशी स्पष्ट भूमिका आंदोलकांनी मांडली आहे. समान काम, समान वेतन हे धोरण लागू करून कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करावा, अशीही ठाम मागणी करण्यात आली आहे.

इतर शासकीय विभागांप्रमाणे मनरेगा विभागासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून पदनिहाय आकृतिबंध (कॅडर स्ट्रक्चर) निश्र्चित करण्यात यावा, यासाठीही कर्मचाऱ्यांचा आग्रह आहे. सध्या असलेली कंत्राटी व अस्थायी व्यवस्था मनरेगा योजनेच्या कार्यक्षमतेवर परिणाम करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात २३ जानेवारी ते २७ जानेवारी दरम्यान कार्यालयीन कामकाजावर काळ्या पट्ट्या लावून निषेध नोंदविण्यात येणार आहे. त्यानंतर २७ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत कामबंद व असहकार आंदोलन राबविले जाणार आहे. पुढील टप्प्यात २ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी दरम्यान मुंबईतील आझाद मैदानात ठिय्या आंदोलन करण्यात येणार असून, ६ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी या काळात साखळी उपोषणाद्वारे आंदोलन अधिक तीव्र केले जाणार आहे.

या सर्व टप्प्यांनंतरही शासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास ११ फेब्रुवारीपासून बेमुदत आंदोलन, आमरण उपोषण व अन्नत्याग आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा मनरेगा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. राज्यभरातील जिल्हा चखड समन्वयक, कार्यक्रम व्यवस्थापक, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक सहाय्यक, डेटा एंट्री ऑपरेटर व वाहनचालक संघटनांनी या आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवला आहे. मनरेगा योजनेच्या अंमलबजावणीत कणा असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मागण्या, शासनाने गांभीर्याने घ्याव्यात, अन्यथा योजनेच्या कामकाजावर मोठा परिणाम होईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांकडून देण्यात आला आहे. आता शासन या राज्यव्यापी आंदोलनाची दखल घेते का, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

(मग्रारोहयो कर्मचारी संपावर गेल्यामुळे रोजगार हमी विभागाचे वैयक्तिक व सार्वजनिक कामाचे संपूर्ण कामकाज ठप्प झाले आहे.

महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेचा पाठींबा

खासदार श्री निलेश लंके, अहिल्यानगर

खासदार श्री संजय जाधव, परभणी.)

## सार्वजनिक शिवजयंती अध्यक्षपदी कृष्णा मोरे

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. ०४ फेब्रुवारी :** पैठण शहरात अनेक वर्षांपासून सातत्याने छत्रपती शिवाजी महाराजांची सार्वजनिक पद्धतीने जयंती साजरी करणाऱ्या सार्वजनिक शिवजयंती समितीच्या अध्यक्षपदी कृष्णा पाटील मोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



१९ तारखेला होणाऱ्या शिवाजी महाराज जयंती संदर्भात सार्वजनिक शिवजयंती समितीची बैठक छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाली. मा.अध्यक्ष बाळासाहेब पठाडे यांच्या अध्यक्षतेत संपन्न या बैठकीत मा.कार्याध्यक्ष अनिल राऊत, किशोर सदावर्ते,महेश पवार, शिवराज पारीख, किरण जाधव, सुभाष नवथर, ज्ञानेश्र्वर वाघे, असलम पठाण, अंकुश काळे, नीरज पापुलवार, रामभाऊ शेळके, जनार्धन मिटकर, साईनाथ कर्डिले, सुनील काकडे, दिलीप टेके, तुषार बटुळे, मनोज ढवळे, करण भोसले, भारत रत्काटे, ऋषी दहिभाते, आदित्य चौगुले, हर्षद शिंदे, रोहित हिंगे, गणेश साळुंखे, किरण लिंबोरे, विशाल जगताप, ऋषिकेश चौरे, विश्र्वेश कुलभैय्या, अजय कामठी, कृष्णा शिंदे आदी उपस्थित होते. या सभेत जयंती साजरी करण्यासाठी समितीचे नवनियुक्त अध्यक्ष कृष्णा मोरे यांच्या मार्गदर्शनात गठीत समितीचे कार्याध्यक्ष म्हणून गौरव खिरे यांची निवड करण्यात आली. समितीचे उपाध्यक्ष नितीन देशमुख यांची निवड करण्यात आली. यावेळी कृष्णा मोरे यांची निवड होताच शिवभक्तांनी जल्लोषात स्वागत करीत त्यांना शुभेच्छा दिल्यात.

छत्रपती शिवाजी महाराज हे अठरापगड जातीचे आराध्य दैवत आहेत. त्यांची जयंती सर्व जाती जमातींना सोबत घेऊन होणे गरजेचे असून, त्या दृष्टीने आपण प्रयत्न करून सर्व समाजाला सामूहिकपणे सोबत घेऊन विविध उपक्रमांच्या माध्यमातून भव्य दिव्य ही शिवजयंती साजरी करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी मोरे यांनी केली.

## सोयगाव फाट्यावर क्रुझर गाडी मोटरसायकल यांच्यात अपघात

**तभा वृत्तसेवा**

**फर्दापूर, दि. ०४ फेब्रुवारी :** फर्दापूर छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर सोयगाव फाट्यावर क्रुझर गाडी मोटरसायकल यांच्या मध्ये अपघात मंगळवारी सकाळी दहा वाजता क्रूजर गाडी व मोटरसायकल यांच्यामध्ये समोरासमोर अपघात झाला असून यात मोटर सायकल जागीच ठार झाला असून मयत सबदर मन्सुर तडवी वय ५२ मोटरसायकल क्रमांक एम एच १९ ऐ एफ ५५२७ क्रूजर गाडी क्रमांक एम पी ०९ बी डी ९७१८ या दोन्ही गाड्या मध्ये सोयगाव फाट्यावर अपघात झाला असून यातील मोटरसायकल जागीच ठार झाला असून त्यास सोयगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून डॉक्टर यांनी मयत घोषित केले यावेळी घटनास्थळी पोलिस कर्मचारी फिरोज तडवी, निलेश लोखंडे उपस्थित राहून पंचनामा करण्यात आला.

## एमजीएममध्ये ‘ग्लिट्झ २के२६’ वार्षिक स्नेह संमेलनाचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०४ फेब्रुवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.जी.वाय.पाथ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात ’ग्लिट्झ २के२६’ वार्षिक स्नेह संमेलनाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी, प्राचार्या डॉ.प्राप्ती देशमुख, डॉ.सारिका शेळके, डॉ.संजय आझ-ादे, डॉ.सतीश संकाये, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

या स्नेहसंमेलनात विविध सांस्कृतिक पोशाख, रांगोळी, मेहंदी, फन गेम, रेट्रो मेकिंग स्पर्धा, रेट्रो बॉलीवूड लुक, ट्विन्स मिसमॅच, फूड फेअर, क्रिडा स्पर्धा आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे.

रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक ममता पांचाळ, द्वितीय क्रमांक श्र्वेता सोनवणे; मेहंदी स्पर्धेत प्रथम क्रमांक मारिया खिपतिया, द्वितीय क्रमांक कल्याणी अंभोरे यांनी प्राप्त केला. ट्रॅडिशनल डे स्पर्धेत प्रथम क्रमांक सानिका घोडके, द्वितीय क्रमांक आशिष गोला टेझर हंट स्पर्धेत प्रथम क्रमांक खोदीजा खान, काजल विश्र्वकर्मा, लेवीझा फातेमा, शिबा खान, आदर्श चौधरी तर द्वितीय क्रमांक आदिती पाठक, श्रेया भुजंग, सपना झुंजर्डे, गौरव मोरे, राज लांडे, सृष्टी गायकवाड यांनी पटकावला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदिनी धुमाळ व सिद्धी तांदळे यांनी केले. या स्नेह संमेलनाच्या यशस्वितेसाठी डॉ.रुहाना कादरी, डॉ.भूषण पवार, प्रा.परमेश्वर लघाने, सोनल सातोनकर, प्रा.राहुल भालेराव, प्रा. लक्ष्मण तौर, डॉ.दीपाली लोहारे, प्रा.किरण कुमार पाटील, डॉ.वैशाली चव्हाण, प्रा.राजू साबळे व सर्व संबंधितांनी प्रयत्न केले.

## वेळीच तपासणी व लवकर निदानामुळे कर्करोगावर प्रभावी मात शक्य : डॉ. जॉर्ज फर्नांडिस

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०४ फेब्रुवारी :** जागतिक कर्करोग दिनाच्या पार्श्वभूमीवर युनायटेड बाय युनिक या जागतिक संकल्पनात्मक अभियानाशी सरेखित राहून कमलनयन बजाज हॉस्पिटलने कर्करोगाच्या लवकर तपासणी, अचूक निदान, समन्वयित उपचारपद्धती आणि नैतिक आरोग्यसेवा या बाबींवरील आपली संस्थात्मक वचनबद्धता अधोरेखित केली. या उपक्रमाला हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांचे धोरणात्मक नेतृत्व लाभत आहे.

यावेळी बोलताना डॉ. फर्नांडिस यांनी सांगितले की, कर्करोग हा एकसाची रोगप्रकार नसून प्रत्येक रुग्णाची वैद्यकीय प्रोफाइल वेगळी असते. वेळेवर तपासणी, प्रारंभिक टप्प्यातील निदान आणि बहुवैद्यकीय तज्ज्ञांच्या समन्वयातून दिले जाणारे उपचार यामुळे उपचार परिणामकारकता मोठ्या प्रमाणात वाढते. लवकर निदान हेच मृत्युदर कमी करण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे.

गेल्या ३५ वर्षांपासून कमलनयन बजाज हॉस्पिटल कर्करोग उपचार क्षेत्रात विश्र्वासार्ह आरोग्यसेवा संस्था म्हणून कार्यरत असून, अत्याधुनिक तंत्रज्ञान, तज्ज्ञ वैद्यकीय मनुष्यबळ आणि मानवी संवेदनशीलतेवर आधारित सेवा मॉडेल यांच्या एकात्मिक अंमलबजावणीद्वारे सर्वसमावेशक कर्करोग उपचार प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

संस्थेच्या प्रतिबंधक आरोग्य धोरणाअंतर्गत स्तन, गर्भाशय मुख, तोंड, फुफ्फुस व जठरांत्र कर्करोगासाठी नियमित तपासणी शिबिरे आयोजित केली जातात. या माध्यमातून समुदायस्तरावर जागरूकता निर्माण करणे, जोखमीचे घटक ओळखणे आणि रोगाचे लवकर व्यवस्थापन साध्य करण्यावर भर दिला जात आहे.



जागतिक कर्करोग दिनानिमित्त हॉस्पिटलने लवकर तपासणी सेवांचा विस्तार, नाविन्यपूर्ण उपचारपद्धतींचा अवलंब आणि सर्वसामान्यांसाठी सुलभ, पारदर्शक व रुग्णकेंद्रित कर्करोग सेवा उपलब्ध करून देण्याचा आपला दीर्घकालीन आरोग्यदृष्टिकोन पुन्हा अधोरेखित केला.

## ‘रणपति शिवराय स्वारी आग्रा’ ६ फेब्रुवारीला प्रदर्शित

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०४ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्रा स्वारीवर आधारित ‘रणपति शिवराय स्वारी आग्रा’ हा ऐतिहासिक मराठी चित्रपट ६ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होत आहे. दिग्पाल लांजेकर लिखित-दिग्दर्शित हा चित्रपट पॅनोरमा स्टुडिओज व मुगाफी निर्मित आहे.

चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते पुनीत इस्सर मिर्झा राजे जयसिंग यांच्या भूमिकेत दिसणार असून भव्य मांडणी व सशक्त कथानकामुळे चित्रपटाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त होत आहेत.



निर्माते कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक, विपुल अग्रवाल, जेनील परमार, मुरलीधर छतवानी असून जागतिक वितरण पॅनोरमा स्टुडिओज करणार आहे.


### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.२९/२०२६

१) इमलबाई नामदेव सर्यवंशी (कोळी) वय ७३ वर्ष धंदा घरकाम, रा. पंचशील नगर, भोपाल हुझुर, भोपाल मध्यप्रदेश. २) प्रतिभा रवींद सोनवणे वय ५० वर्ष धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे ३) बबिता मधुकर बाघले, वय ४८ वर्ष, धंदा घरकाम, रा. ४०४/१३, वार्ड क्र. ०२, डोईफोड्या बुऱ्हानपूर, मध्यप्रदेश. ४) सुनिता धनराज निकम, वय ४३ वर्ष, धंदा घरकाम, रा. घर क्र. १२०, निलगिरी बाग, झोपडपट्टी, औरंगाबाद लिंक रोड, पंचवटी नाशिक, जिल्हा नाशिक.

विरुद्ध - निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे वाचत,

सर्व संबंधितास नाहिर प्रफटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड सचिन सुनिल गिरी, रा.सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगायाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत नामदेव सोनाजी सूर्यवंशी (कोळी) यांचा दिनांक २०.१२.२०२३ रोजी मीने पंचशील नगर, भोपाल हुझुर, भोपाल मध्यप्रदेश येथे मृत्यू झालेला असुन त्याच्या पश्यात परील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायलयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत नामदेव सोनाजी सूर्यवंशी (कोळी) यांचे वारस असुन त्यांना शासकिय निमशासकिय तसेच गट क्र. १६३ क्षेत्र ५० आर हे नावावर करण्यासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपाना आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल आजरोजी दिनांक ०३.०२.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

**पु. ता. १८.०३.२०२६**

**क.लिपीक**

**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)**

**सहाय्यक अधीक्षक**

**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)**

प्रतिलीपी :-

१)नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.

२) ग्रामपंचायत उप्पलखेडा ता. सोयगाव जिल्हा छत्रपती संभाजीनगर,

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि. छ. संभाजीनगर**

सिव्हील एम. ए.नं. २५ / २०२६

अर्जदार:-१) शोभाबाई प्रकाश मुंजाळ, वय ५२ वर्षे धंदा. शेती २) नवनाथ प्रकाश मुंजाळ, वय ३२ वर्षे धंदा. शेती ३) आकाश प्रकाश मुंजाळ, वय २५ वर्षे धंदा. शिक्षण सर्व रा. खडक नारळा, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर

-विरूद्ध :-

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण:- कलम २ बॉम्बे रेगुलेशन क्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, अर्जदार नं. १ याचे पति व २ व ३ यांची वडिल नामे श्री. प्रकाश लक्ष्मण मुंजाळ हे दि. ०२/०१/२०२३ रोजी मौजे खडक नारळा ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही.मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर सकीय कामासाठी आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

**पुढील तारीख २५/०२/२०२६**

**कनिष्ठ लिपिक.** **आदेशावरून**

**सहाय्यक अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.२८/२०२६

१) मंगलाबाई भगवान बडक, वय ५२ वर्ष, धंदा घरकाम, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर,

विरुध्द

१) वसंता गोविंदा आहेर, वय ६० वर्ष, रा. मेणगाव, ता. जामनेर, जिल्हा जळगाव. २) भगवान गोविंदा आहेर, वय ५५ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे वावत,

सर्व संबंधितास जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र देण्याकरीता मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, रा. सोयगांव तालुका सोयगाव जिल्हा औरंगाबाद यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे .मयत गोविंदा नथ्थू आहेर गांचा दिनांक ३०.०८.२०१९ रोजी मौजे मेणगाव, ता. जामनेर, जिल्हा जळगाव येथे मृत्यू झालेला असून त्याच्या पश्र्चात वरील अर्जदार व गैरअर्जदार क. १ व २ हे यार आहे असा अर्ज मा.न्यायलयात केलेला आहे.अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ व २ है मयत गोविंदा नथ्थू आहेर यांचे वारस असून त्यांना शासकीय /निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रांसह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना या कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल आजरोजी दिनांक ०३.०२.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्यात दिले असे

पु.ता. १८.०३.२०२६

**क.लिपीक**

**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)**

**सहाय्यक अधीक्षक**

**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)**

प्रतिलीपी

१)नोटीस बोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव,

२)ग्रामपंचायत कार्यालय आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर,

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.२४/२०२६

१) चतरसिंग शामसिंग राजपूत, वय ५६ वर्ष, धंदा शेती, रा. पळसखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २) संदीप चतरसिंग राजपूत, वय ३२ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३) करणसिंग चतरसिंग राजपूत, वय ३० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४) राहुल चतरसिंग राजपूत, वय २८ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध- निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बावत,

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव जिल्हा - औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत लताबाई चतरसिंग राजपूत यांचा दिनांक २९.१२.२०२५ रोजी मौजे पळसखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्र.१ व ४ है वारस आहे, असा अर्ज मा. न्यायलयात दाखल केलेला आहे. अर्जदार व ४ है मयत लताबाई चतरसिंग राजपूत यांचे वारस असून त्यांना शासकिय निमशासकिय कामासाठी वारसाणपत्रासाठी आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या पारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध बेल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ३/२/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिफ्क्यासह दिले असे.

पु. ता. १८/३/२०२६

**क.लिपीक**

**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)**

**सहाय्यक अधीक्षक**

**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)**

प्रतिलीपी

१)नीटीसबोर्ड, दिवाणी व फोजदारी न्यायालय सोयगांव,

२)ग्रामपंचायत कार्यालय पळसखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर,

# मध्यमवर्गीय गरीब शेतकऱ्यांची लवकरच कर्जमाफी - मंत्री बावनकुळे

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ०४ फेब्रुवारी :** कर्ज व कर्जावरील व्याजाचा भरणा करता न येर्णाय़ा गरीब मध्यमवर्गीय शेतर्क़यांची कर्जमाफी लवकरच करण्यात येणार असल्याचा खुलासा भाजपाचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी करुन राज्यसरकारची भुमिका स्पष्ट केली.तसेच कर्जमाफीबाबत पसरवले जात असलेले गैरसमज दूर करत त्यांनी सरकारची भूमिका जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारसभेत लामजना येथे मंगळवार दि. ३ रोजी मांडली असून देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. कर्जमाफीचा लाभ खरोखरच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांनाच लवकरच मिळेल. असा ठाम विश्र्वास व्यक्त केला.

औसा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रचारार्थ लामजना येथील प्रचारसभेत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. माजी मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर भाजपाचे जिल्हाध्यक्ष, माजी मंत्री बसवराज पाटील, आमदार अभिमन्यू पवार, सभापती चंद्रशेखर सोनवणे, ड परीक्षीत पवार उपस्थित होते.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले,अभिमन्यू, तुम्ही सर्व गावांची यादी तयार करा. मी एक शासन आदेश काढून गायरानवर, बंजारा वस्तीत किंवा इतर वस्तींमध्ये राहणाऱ्या सर्व कुटुंबांचे कबाले वाटप करून देण्याची जबाबदारी घेतो, अशी घोषणा करुन बंजारा समाजाला दिलासा दिला.

घरकुलासाठी कमाल मर्यादा न मिळालेल्या कुटुंबांनाही न्याय दिला जाईल.समाजाच्या शेवटच्या घटकाच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य सरकार विविध योजना राबवत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नव्याने मुख्यमंत्री बळीराजांचे योजना तयार करण्यात आली असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.त्यासाठी अनेक लोकप्रतिनिधींचे योगदान लाभल्याचे त्यांनी नमूद केले.लातूर जिल्ह्यातील आमदार अभिमन्यू पवार व संभाजी पाटील निलंगेकर




राज्यातील उत्कृष्ट आमदारांमध्ये असून, विकसित लातूर या संकल्पनेतून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री बावनकुळे पुढे म्हणाले, येणारी जिल्हा परिषद निवडणूक ही व्यक्तीची नसून, केंद्राच्या ५५ व राज्याच्या ४४ योजनांचा लाभ शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ओबीसी, बंजारा व वंचित घटकांसाठी विशेष योजना राबवण्यात येणार असून सात तारखेला होणारी निवडणूक विकासासाठी महत्त्वाची असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.विकसित लातूर २०४७ या दृष्टीकोनातून लातूर, निलंगा व किल्लारीचा विकास केला जाणार असून, केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीचा मोठा लाभ मराठवाड्यासह लातूर जिल्ह्याला होणार आहे.तसेच लाडकी बहीण योजना बंद होऊ दिली जाणार नाही, अशी ग्वाही दिली. ज्या ठिकाणी काँग्रेसची सत्ता आली, त्या ठिकाणी ही योजना बंद झाल्याचा आरोप मंत्री बावनकुळे यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवण्यासाठी बिना व्याज, बिना जामीन कर्ज देणारी योजना जाहीर केली आहे. महाराष्ट्राला यावर्षी केंद्र सरकारकडून एक लाख कोटी रुपयांचा निधी मिळणार असून, त्याचा मोठा लाभ मराठवाड्यासह लातूर व धाराशिव जिल्ह्याला होणार आहे.राज्यात लाडकी बहीण योजना सुरू असलेल्या ठिकाणी ती पुढेही चालू राहणार आहे.महिलांना पाच लाख रुपयांपर्यंतचे रोजगार कर्ज देऊन स्वयंपूर्ण केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेमार्फत महिला बचत गटांसाठी व्यावसायिक संकुल उभारून त्यांच्या तयार वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### पाच वर्षात प्रभावीपणे योजना राबविल्या - बसवराज पाटील

आमदार संभाजी पाटील निलंगेकर व आमदार अभिमन्यू पवार जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून तळा-गाळातील घटकांना न्याय देण्याची भूमिका बजावत आहेत. जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून २५ वर्षांत २० वर्षे काँग्रेस सत्तेत होती, तर केवळ ५ वर्षे भाजप सत्तेत असूनही त्या काळात भाजपाने सर्व योजना प्रभावीपणे राबवून सर्वसामान्यांना न्याय दिल्याचा दावा भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी यावेळी केला.

एससीईआरटी तर्फे आयोजित राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेत

# अनिता यलमटे राज्यात द्वितीय

## राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेत मिळवले घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०४ फेब्रुवारी :** महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग एससीईआरटी मार्फत आयोजित शिक्षक व अधिकारी/ कर्मचारी राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेत येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयाच्या उपक्रमशील शिक्षिका अनिता यलमटे यांनी महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. .

शालेय शिक्षण विभागामार्फत शिक्षक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध स्पर्धांचे आयोजन एससीआरटी तर्फे करण्यात आले होते. अनिता येलमटे यांनी कथालेखन स्पर्धेत केंद्र ,तालुका ,जिल्हा व विभागस्तरावरून यशस्वी होत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता. या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील ४० स्पर्धकांचा सहभाग होता. या अत्यंत प्रतिष्ठेच्या व चुरशीच्या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक अनिता येलमटे यांच्या 'हिरवाई हरवते तेव्हा' या कथेने प्राप्त केला. त्यांच्या या यशाने लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये चैतन्याचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



'अनिता यलमटे' यांना महाराष्ट्र शासनाच्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त असून त्या राज्यपाल नियुक्त सांस्कृतिक धोरण समितीच्या सदस्य आहेत तसेच उदगीरच्या साहित्यिक,सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळीत सक्रिय सहभाग नोंदविणाऱ्या त्या विद्यार्थीप्रिय शिक्षिका आहेत. विद्यार्थ्यांना लिहिते वाचते करण्यासाठी त्यांनी सातत्याने विविध प्रयोग केले आहेत. सातारा येथे झालेल्या ९९व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात त्यांना कवितेसाठी निमंत्रित केले होते. त्या महाराष्ट्रातील प्रथितयश कवियत्री व कथाकथनकार आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल लातूरचे शिक्षणाधिकारी दत्तात्रेय मठपती, तृप्ती अंधारे, गटशिक्षणाधिकारी शेख शफी , शिक्षण विस्ताराधिकारी नितीन लोहकरे ,केंद्रप्रमुख बालाजी धमनसुरे, विषयतज्ज्ञ ज्ञानोबा मुंडे ,भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलुरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे,लालबहादूर शास्त्री शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष मधुकर वट्टमवार ,केंद्रीय सदस्य तथा कार्यवाह शंकराव लासुणे , शालेय समिती अध्यक्ष सतनाप्पा हूरदळे ,मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ,पर्यवेक्षक व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

**उदगीरची माती लेखणीला बळ देणारी**

या यशाविषयी प्रतिक्रिया व्यक्त करताना अनिता यलमटे म्हणाल्या, या यशाने केवळ माझ्या लेखणीचा नव्हे, तर उदगीरच्या साहित्यिक चळवळीचाही सन्मान झाला आहे. सातत्याने लेखन करत राहण्याची प्रेरणा या मातीतूनच मिळते.

# लक्ष्मण अकनगीरे यांचा सेवापुर्ती सोहळा सपन्न

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ०४ फेब्रुवारी :** रेणापूर येथील लक्ष्मण पंढरीनाथ अकनगीरे यांचा सेवा पुर्ती सोहळा अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापुर पासुन जवळच असलेल्या जवळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण अकनगीरे यांच्या सेवापुर्ती सोहळा मोठ्या उत्साहात सपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सोमवंशी, प्रमुख पाहुणे म्हणून विस्ताराधिकारी श्रीराम कन्नाके, मुख्याध्यापक अशोक हारे, केंद्रप्रमुख हरिदास आगलावे, सरपंच सतीश हारे, उपसरपंच विश्रांती पवार, शालेय व्यवस्थापन समितीअध्यक्ष लिंबराज हारे, उपाध्यक्ष नम्रता माने, माजी जी.प.सदस्य संजय गिराम हे होते.

लक्ष्मण अकनगीरे हे सन २०२३ पासुन जवळगाव शाळेत कार्यरत होते बर्दापुर केंद्राचे केंद्रींय मुख्याध्यापक म्हणून त्यांनी काम पाहीले

सर्वांना समजून घेणारे मन मिळवू स्वभावाचे त्याच्या कामाची शैली हि वाखण्यजोगी असल्याचे कार्यक्रमात अकनगीरे याच्या कार्याचा ओहा पोहा शिक्षक, मित्र परिवारानी कार्यक्रमा प्रसंगी बोलताना केला.



या कार्यक्रमा वेळी लक्ष्मण अकनगीरे यांना सेलुकर सर यांनी सन्मानपत्र दिले त्याचे वाचन शैलजा सेलुकर मॅडम यांनी केले.

तसेच केंद्रातील मुख्याध्यापक,सर्व शिक्षक, पाहुणे, बंधु, इष्टमित्रपरीवार व ग्रामस्थांनी त्यांचा सपत्नीक सत्कार करून लक्ष्मण अकनगिरे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सुत्र संचलन सुर्यवंशी मॅडम यांनी केले. यशस्वीतेसाठी जवळगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक,शिक्षिका कर्मचारी ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले.

# नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय ज्ञान आत्मसात करणे आवश्यक: डॉ. अंजली उगिले

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०४ फेब्रुवारी :** नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी तथा वैद्यकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रत्येकाने समर्पितपने कार्य केलेच पाहिजे, रुग्णसेवेमध्ये प्रत्येकाने आपले संपूर्ण कौशल्य पणास लावत आपल्या शैक्षणिक जीवनात वैद्यकीय सेवेचे संपूर्ण ज्ञान आत्मसात करून त्या ज्ञानाचा उपयोग आपल्या कार्यात केला पाहिजे असे प्रतिपादन डॉक्टर अंजली उगीले यांनी अहमदपूर येथील नवजीवन चरिटेबल ट्रस्टच्या लॅम्प लाईटनिंग कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

नवजीवन चॅरिटेबल ट्रस्ट संचलित नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्सेस, अहमदपूर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक स्नेहसंमेलन आणि




प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचा 'लॅम्प लायटिंग' (शपथ विधी) सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. साई नगर, येथील संस्थेच्या परिसरात हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन अहमदपूर पोलीस स्टेशनचे उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे झाले. यावेळी सुप्रसिद्ध कवी प्रा. अनिल चवळे, राम तत्तापूरे, डॉ. चंद्रकांत उगीले, शिवाजीराव गायकवाड , नागेश गोणे, रेड्डी सर, मिसेस मार्था भूषण आणि पडिले सिस्टर, यांसह अनेक प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. संस्थेचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत उगिले, सचिव डॉ.अंजली उगिले आणि कौस्तुभ उगिले यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

**शपथ विधी आणि सांस्कृतिक आविष्कार**

नर्सिंग क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रज्वलित ज्योतीच्या साक्षीने रुग्णसेवेची शपथ घेतली. 'लॅम्प लायटिंग' या पवित्र सोहळ्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून आपल्या कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली यामध्ये रामराव केंद्रे, गणेश मुंडे, चव्हाण अंजली, माने मंदा,उगिले शुभांगी यांच्यासह इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी पूर्ण मेहनतीने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

# जिल्हा परिषद - पंचायत समिती रणसंग्राम :

## विकासाचा लेखाजोखा आमच्यासमोर मांडा, मतदार

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव, दि. ०४ फेब्रुवारी :** अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर राजकीय रणधुमाळीला वेग आला आहे. भाजप, काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी, प्रहार जनशक्ती पक्ष व इतर पक्षाच्या उमेदवारांनी प्रचाराची कंबर कसली असली, तरी प्रत्यक्ष लढत भाजप महायुती आणि काँग्रेस महाविकास आघाडी यांच्यातच रंगणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

तथापि, राजकीय समीकरणे अनपेक्षित वळण घेऊ शकतात आणि एखादा दुसराच उमेदवार बाजी मारू शकतो, अशी चर्चाही राजकीय वर्तुळात सुरू आहे. मागील निवडणुकीत भाजपला अपेक्षित मताधिक्य मिळाले होते'. परंतु किनगाव परिसरात कोणती व किती विकास कामे झाली, याचा ठोस लेखाजोखा जनतेसमोर मांडला जावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर व्हावी अशी अपेक्षा असताना, रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार यांसारखे मूलभूत प्रश्न अद्याप अनुत्तरीतच आहेत. प्रत्येक निवडणुकीत भावनिक मुद्द्यांचा पाऊस पाडून मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न होतो.मात्र उपदेश देऊन मते मिळविणे ही सर्वात स्वस्त राजकीय युक्ती ठरत असल्याची भावना किनगाव मध्ये प्रकर्षाने दिसून येते.

लोकप्रतिनिधी हे जनतेचे हक्क मिळवून देण्यासाठी निवडले जातात. मात्र जिल्हा परिषद व पंचायत समितीचे प्रतिनिधी हे शहराचे प्रश्न सभागृहात किती वेळा आणि किती प्रभावीपणे मांडतात, हा खरा कस आहे. पायाभूत सुविधावर प्रत्यक्ष झालेले काम आणि अपूर्ण प्रकल्पाचा हिशोब देण्यास अनेक उमेदवार टाळाटाळ करत असल्याची चर्चा नागरिकात आहे.

### ज्योतीर्मयी सावित्री पुस्तकाचे अभिवाचन

**लातूर :** येथील नारी प्रबोधन मंचच्या वतीने कोरोना काळात बंद पडलेला अभिवाचनाचा कार्यक्रम यंदा राबविण्यात आला. शनिवारी मंचच्या वतीने अरुणा दिवेगावकर लिखित 'ज्योतर्मिय सावित्री' या पुस्तकाचे वाचन करण्यात आले. अभिवाचन सुनीता देशमुख, सुनीता बोरगावकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. राधाकृष्ण देशमुख यांनी केले. दरम्यान, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी माजी प्राचार्य कुसुम मोरे, हेमलता वैद्य, संगीता शहरकर, सुनंदा जगताप, मंदाकिनी शिंदे, कुसुम पाटील, डॉ. शेख समीना, उषा शिंदे, शोभा आर्य, शोभा वारद आदी उपस्थित होते. तसेच सतीश मिरखलकर, महादेवी स्वामी, सुपर्ण जगताप, अनिल जायभाये, डॉ. बी. आर. पाटील, राजश्री लोंढे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार सुमती जगताप यांनी मानले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते..

### पाइपने केली बेदम मारहाण

**लातूर :** कामावर न आल्याच्या कारणावरून एका मजुराला लोखंडी पाइपने बेदम मारहाण करून त्याचे हात-पाय फोडल्याची धक्कादायक घटना उदगीर तालुक्यातील हेर येथे घडली आहे. या प्रकरणी तानाजी गायकवाड (रा. डिग्रस) याच्याविरुद्ध उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजकुमार उर्फ आनंद स्वरूप मोने हे २८ जानेवारी रोजी हेर गावाच्या पश्र्चिमेस असताना ह घटना घडली. आरोपी तानाजी गायकवाड याने राजकुमार यांना काल कामाला का आला नाहीस, असा जाब विचारत शिवीगाळ सुरू केली. वाद वाढल्याने आरोपीने त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

# उदगीरची लढाई : २६६ वा ऐतिहासिक संस्मरणीय दिन उत्साहात साजरा

### उदगीरच्या किल्ल्यावर इतिहासप्रेमींची मोठी उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०४ फेब्रुवारी :** उदगीर शहराच्या इतिहासातील गौरवशाली पर्व असलेल्या उदगीरच्या ऐतिहासिक लढाईचा २६६ वा संस्मरणीय दिन मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी उदयगिरी इतिहास संवर्धन समिती, उदगीर व आर्य समाज, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम सकाळी ११ वाजता उदगीरच्या ऐतिहासिक किल्ला उदागीरबाबा समाधीस्थळ परिसरात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली झी माऊंट लिटरा या शाळेच्या विद्यार्थ्यांनी गाईले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अर्जुन सोमवंशी तर प्रमुख पाहुणे मा.माणिकरावजी बावणे, (नाईक बावणे सरदार यांचे वंशज तांदूळजा)मा. प्राचार्य डॉ.





मुकुंदजी देवर्षी (अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली) डॉ.बाबासाहेब शेप (वैद्यनाथ महाविद्यालय परळी) यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात उदगीरचा किल्ला व ऐतिहासिक महत्त्व या विषयावर सुप्रसिद्ध युवा इतिहासकार मा. डॉ. रवीजी सातभाई (अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली) यांनी अभ्यासपूर्ण व प्रभावी व्याख्यान दिले. त्यांनी ३ फेब्रुवारी १७६० रोजी लढल्या गेलेल्या उदगीरच्या लढाईचे ऐतिहासिक, सामरिक व राजकीय महत्त्व सविस्तरपणे विशद केले. मराठा साम्राज्याच्या शौर्याची, रणनितीची व नेतृत्वाची ही लढाई संपूर्ण भारताच्या इतिहासात कशी निर्णायक ठरली, यावर त्यांनी प्रकाश टाकला.

प्रमुख वक्त्यांसह मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, उदगीरची लढाई ही केवळ युद्ध नसून ती स्वराज्याच्या रक्षणासाठी दिलेल्या बलिदानांची अमर गाथा आहे. अशा ऐतिहासिक घटनांचे स्मरण जतन करून भावी पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास उदगीर शहर व परिसरातील इतिहासप्रेमी नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली त्यात नगरसेवक धीरज कसबे, नेमिनाथ गिड्डे, अनिल पुदाले, घाडगे, उद्धव महाराज, डॉ अनिल भिकाने, मुडपे गुरुजी, बाबूराव माशाळकर ,शिवाजी सगर, कुलकर्णी मंजुषा, उषा तोंडचिरकर, सुमित्रा कोयले, रणदिवे बालाजी, बाबुराव नवटक्के,बंडाप्पा पडसंगे प्रा.धनराज बंडे, सोनू महाराज, श्रीपाद करंजीकर, महादेव रोडगे,सचिन घोळवे बालाजी रोडे, पाटील बी एन, दिलीप कंधारे,दिनेश गवारे , दिगंबर बुरसपटे, त्याचबरोबर झीमाऊंट लिटरा, सरदार वल्लभाई पटेल शाळा, संग्राम माध्यमिक शाळा स्वर्णमाता शाळा, हावगीस्वामी महाविद्यालय, कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय उदगीर इत्यादी शाळा, महाविद्यालयातील शिक्षक प्राध्यापक विद्यार्थी व विद्यार्थिनी, उदगीर मधील विविध क्षेत्रातील नामवंत ज्येष्ठ नागरिक गुड मॉर्निंग ग्रुप, जिव्हाळा ग्रुप, पतंजली ग्रुप, १२ बलुतेदार ग्रुप, इत्यादी विविध संघटनेतील सहभागी सदस्य या कार्यक्रमास उपस्थित होते.उपस्थितांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ड . शिवाजीराव कोकणे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय डॉ अनंत शिंदे व आभार संतोष कुलकर्णी

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अरविंद शिंदे, प्रा. बी. एन. नवटके, डॉ. नरेंद्र शिंदे (आर्य समाज), महादेव घोणे, एम. टी. गायकवाड, सावन टाकसाळे, उद्धव महाराज हैबतपूरे, दिगंबरराव बुरसपटे मुरली फिरंगवाड यांच्यासह सर्व आयोजक व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. व्यवस्थापनाची जबाबदारी सतीश चव्हाण, बालाजी रणदिवे, श्याम कांबळे, धीरज गबारे व बालाजी गवारे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

उदगीरच्या ऐतिहासिक वैभवाला उजाळा देणारा हा कार्यक्रम इतिहासप्रेमींमध्ये नवचैतन्य निर्माण करणारा ठरला. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली

## अग्रलेख...

# मुठीतल्या जगाने 'जगणे' गिळले

प्रखर प्रकाशाची नेत्रदीपक रोषणाई न्याहाळताना काही क्षण डोळे अक्षरशः दिपून जातात, पण नजर बाजूला झाली, की काही क्षण आसपासचे काहीच दिसतदेखील नाही. आज झपाट्याने सुरू असलेल्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे काहीसे तसेच होऊ लागले आहे. या प्रगतीच्या तेजाने डोळे दिपल्यामुळे त्याच्या अभिमानास येणाऱ्या भरतीच्या लाटा ओसरल्यावर नजर बाजूला केली की त्याच डोळ्यांसमोर काही क्षण अंधारी आल्यासारखे होऊ लागते. प्रगतीच्या त्या नशेमुळे सुरुवातीस याची फारशी दखल घेतली गेली नाही. किंबहुना, डोळ्यासमोर येणारी अंधारी साहजिकच आहे असे समजून त्याकडे दुर्लक्षदेखील केले गेले. पण याच प्रगतीच्या तेजामुळे दिपलेल्या डोळ्यांसमोरची अंधारी आता दूर होऊ लागली असून, त्या तेजामागची दुसरी अंधारलेली बाजू उजेडात येऊ लागली आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर झालेल्या देशाच्या आर्थिक पाहणी अहवालाने ही बाजू अधिक ठळकपणे उजेडात आणली आहे आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे दिपलेले डोळे आता खाडकन् उघडले आहेत. एका भयग्रस्त भविष्याचे चित्र आता नजरेसमोर स्पष्ट झाले आहे आणि प्रगतीच्या तेजाने भुलून जाण्यापेक्षा, त्या भविष्यचित्राच्या जाणिवांचे भान ठेवण्याची गरज अधोरेखित झाली आहे. देशाच्या आर्थिक पाहणी अहवालाने तीच गरज दाखवून दिली असून त्याची दखल घेतली नाही तर भविष्यात भावी पिढीला गंभीर परिणाम सहन करावे लागतील असा इशारादेखील दिला आहे. डिजिटल व्यसनाधीनतेचा विळखा तरुण मुले आणि बालकांभोवती घट्ट आवळला जात असून त्यामुळे आरोग्याच्या समस्या तर गंभीर होत आहेतच, पण मानसिक आरोग्याच्या समस्यादेखील उग्र होत जातील अशी भीती व्यक्त करणारी आकडेवारी या अहवालातून समोर आली आहे. या व्यसनाच्या विळख्यात गुरफटलेली बालके आणि मुलांच्या शैक्षणिक क्षमता ढासळत चालल्या असून, कामाच्या ठिकाणी आवश्यक असलेली उत्पादनक्षमताही कमी होत आहे. डिजिटल व्यसनांमुळे निद्रानाश, एकाग्रतेचा अभाव आणि मानसिक संभ्रमावस्थेसारखे विकार बळावत असून १५ ते २४ वयोगटातील मुलांमध्ये या व्यसनापायी वैफल्यग्रस्तता आणि चिंता यांसारखे विकार वाढत आहेत. अशाच अनेक दुष्परिणामांमुळे बिघडत चाललेल्या भावी पिढीला वाचविण्यासाठी सरकारी स्तरावर ठोस उपाययोजनांची गरजही या अहवालातून व्यक्त करण्यात आली आणि अशा विकारांनी ग्रासलेल्या मुलांच्या चिंताग्रस्त कुटुंबांचे एक विदारक चित्रदेखील स्पष्ट झाले. टेलिमानस नावाची एक दूरस्थ सल्ला योजना सरकारने चार वर्षांपूर्वी अंमलात आणल्यापासून अशा चिंतेने ग्रासलेल्या सुमारे ३२ लाख पालकांनी उपायाकरिता या योजनेकडे धाव घेतल्याचे स्पष्ट झाले.

डिजिटल क्रांती ही आजच्या जगाची अपरिहार्यता आहे, त्यामुळे त्याच्या फायद्यातोट्यांपासून पूर्णपणे अलिप्त राहणे कोणालाच शक्य नाही, हे खरे असले, तरी या क्रांतीच्या दुष्परिणामांची फळे चाखण्याची वेळ कोणावर येऊ नये यासाठी काही ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत, असा इशारा आर्थिक पाहणी अहवालाने दिल्यानंतर लगेचच महाराष्ट्रात उपाययोजनांची आखणी सुरू झाली ही बाब समाधानकारक म्हणावी लागेल. सोशल मीडिया आणि डिजिटल व्यसनांच्या गंभीर विकाराचे दुष्परिणाम वेळीच रोखता यावेत याकरिता या क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेला कृतिगट स्थापन करण्याचा निर्णय राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी घेतला आहे. या कृतिगटाच्या अहवालानंतर, या साधनांचा वापर करण्याबाबत वयोमर्यादा आखून देण्याबाबत राज्य सरकारचा विचार असल्याचे सांगण्यात येते. ३५ वर्षांखालील तरुणांमध्ये मानसिक आजार वाढण्यामागे डिजिटल व्यसनाधीनता हे प्रमुख कारण असल्याच्या एका संस्थेच्या अहवालाचा हवाला देऊन आशिष शेलार यांनी राज्याच्या संबंधित खात्यास कामाला जुंपल्याने, या क्रांतीच्या तेजाने दिपलेल्या महाराष्ट्राच्या नजरेस आता पुढचे सारे काही स्वच्छ दिसू लागल्याची जाणीव निश्चितच दिलासादायक ठरणार आहे. महाराष्ट्रात १८ वर्षांखालील सुमारे चार कोटी मुले समाजमाध्यमांचा वापर करतात आणि त्यापैकी असंख्य मुलांच्या आरोग्यविषयक समस्यांमुळे पालकवर्ग चिंतित झालेला आहे. मुलांच्या शारीरिक आरोग्यासोबतच कार्यक्षमताही ढासळत चालली असून कुटुंबव्यवस्थेची संस्कृतीही धोक्यात येऊ पाहात आहे. त्यामुळे, देशाच्या आर्थिक पाहणी अहवालाचा इशारा गांभीर्याने घेण्याची गरज महाराष्ट्राने ओळखली हे चांगले झाले आहे.

डिजिटल तंत्रज्ञानाने शिक्षण, माहिती आणि संवादाच्या नव्या शक्यता उघडल्या, हे नाकारता येणार नाही. मात्र मर्यादेचा अभाव हा त्याचा सर्वांत मोठा शत्रू ठरत आहे. 'स्क्रीन टाईम' हा शब्द आता केवळ वेळेचा नाही, तर मेंदूच्या वाढीचा, भावनिक परिपक्वतेचा आणि सामाजिक जाणिवांचा प्रश्न बनला आहे. लहान वयात सातत्याने स्क्रीनसमोर बसल्याने मुलांमध्ये डोळ्यांचे विकार, लठ्ठपणा, झोपेचे विकार, मान-पाठीचे दुखणे अशा शारीरिक तक्रारी वाढताना दिसतात. पण त्याचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम ही या व्यसनाची अधिक चिंताजनक बाब आहे. तळव्याएवढ्या आकाराच्या पडद्यावर नजर एकवटून स्वतःस व्यसनाच्या हाती सोपविण्याच्या या सवयीमुळे मुलांमध्ये एकाग्रतेचा अभाव, चिडचिडेपणा, आक्रमकता, चिंता आणि नैराश्य वाढत आहे, हा निष्कर्ष आता नवा राहिलेला नाही. तरीही, 'गेम हरला' किंवा 'मोबाईल काढून घेतला' म्हणून रडणाऱ्या मुलाहाती पुन्हा मोबाईल देऊन मुलाची समजूत काढण्याची पालकांची पळवाटदेखील या संकटास कारणीभूत ठरत आहे.

आभासी जगात 'लाईक्स' आणि 'स्कोअर्स' मिळतात; पण भावनिक सुरक्षितता, सहानुभूती आणि अपयश पचवण्याची क्षमता हरवते. परिणामी, खऱ्या आयुष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची मानसिक ताकद कमी पडते. अगोदरच, सामान्य माणसाच्या जगण्याचा संघर्ष दिवसागणिक तीव्र होत चाललेला असल्याने, सहनशक्तीची कसोटी पार पाडताना पालकांची दमछाक होत आहे. अशा वेळी, कामाच्या व्यापातील व्यत्यय टाळण्यासाठी आणि 'मुलगा शांत बसावा' म्हणून त्याच्या हाती मोबाईल देणारे पालक हे काही खलनायक नाहीत; पण अशीच सततची तडजोड पुढील पिढीचे मानसिक आरोग्य धोक्यात आणते, हेही वास्तव आहे. शाळा, पालक आणि शासन या तिन्ही घटकांनी याकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्राला याची जाणीव वेळेवर झाली आणि सरकारने त्यादृष्टीने पावले उचलली याबद्दल राज्य सरकारचे, विशेषतः आशिष शेलार यांचे अभिनंदन करावयास हवे. कारण, भावी पिढीच्या आरोग्याबाबतची संवेदनशीलता ओळखून कृती समिती नेमण्याचा व त्यानुसार मुलांच्या मोबाईल मग्नतेस लगाम घालण्याचा विचार अन्यथा पालकांच्या कृतीच्या आवाक्याबाहेरच राहिला असता.

आज क्रांतीचा वेग पाहता, डिजिटल जगापासून मुलांना पूर्णपणे तोडणे शक्य नाही आणि तसे करणे आवश्यकही नाही. मात्र वयानुसार मर्यादित स्क्रीन वेळ, शाळांमध्ये डिजिटल साक्षरतेसोबत मानसिक आरोग्य शिक्षण, कुटुंबात मोबाईलमुक्त वेळ, आणि संवादाकरिता पालकांची उपलब्धता, मैदानी खेळ, वाचन आणि कला यांना प्रोत्साहन आणि गरज भासल्यास समुपदेशनाची सोय हे उपाय तातडीने राबवावे लागतील. डिजिटल युगातील मुहूर्तमेढ भारतात रोवली गेली, तेव्हा 'कर लो दुनिया मुठ्ठी में' ही एक घोषणा खूप लोकप्रिय झाली होती. लोकांना त्याची भुरळही पडली होती आणि खरोखरीच, जग मुठीत आल्याच्या प्रत्यक्ष अनुभवाने सगळेच सुखावूनही गेले होते. या क्रांतीची फळे आपल्याला, आपल्या भावी पिढीला मिळावीत या चांगल्या हेतूनेच पालकांनी मोबाईल नावाचे क्रांतियंत्र मुलांच्या हाती सोपवले आणि आता त्याच्या दुष्परिणामांच्या जाणिवा जगात सर्वत्र उमटू लागल्या. क्रांतीच्या वेगात वाहवत जाताना, आपण जग मुठीत धरले खरे, पण त्या नशेमध्ये हरवून जगणे मात्र निसटून जात राहिले, हे आधी लक्षातच आले नाही. आता ती चूक सुधारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आपण मुलांच्या हातात जग देत आहोत, पण त्यांना जगण्याची मानसिक तयारी देतोय का, या प्रश्नाच्या उत्तराचा शोध सुरू झाला आहे. डिजिटल साधनांचा वापर हे व्यसन बनू नये, याची काळजी घ्यायलाच हवी. नाहीतर, तंत्रज्ञानाने समृद्ध पण मानसिकदृष्ट्या कोलमडलेली पिढी पाहावी लागेल आणि त्याचे उत्तर आजच्या पालक पिढीला द्यावे लागेल.

## विशेष


# गरज पारेषणातील त्रुटी दूर करण्याची

**प्रा. सुखदेव बखळे**

भारतात वीज क्षेत्रात कार्यरत असलेल्या वीजनिर्मिती, पारेषण (वहन) आणि वितरण अशा तीन कंपन्यांपैकी उच्च दाबांच्या वाहिन्यांमधून विजेचे वहन घडवण्यास जबाबदार असलेली वीज पारेषण ही अतिशय महत्त्वाची कंपनी आहेत. देशात वेगवेगळ्या योजनांमधून वीज पारेषणसाठी निधी दिला जात असतो. या क्षेत्रातील पायाभूत सुविधांवर खर्च केला जात असतो. देशात वीज पारेषण नेटवर्क आणि त्यासाठी पायाभूत क्षेत्रात सुरू असलेली कामे याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

भारताचे 'हाय व्होल्टेज वीज पारेषण नेटवर्क' २२० किलोवॅट आणि चार लाख ९५ हजार सर्किट किलोमीटर (सीकेटी किलोमीटर) पर्यंत पसरले आहे. या प्रक्रियेमध्ये आज प्रत्यावर्ती धारा (एसी - ऑल्टरनेट सायकल) परिवर्तन क्षमता अंदाजे १३ लाख ५४ हजार मेगावॅटपर्यंत पोहोचली आहे. तिला १८ हजार मेगावॅटपेक्षा जास्त वाढत्या 'हाय व्होल्टेज डायरेक्ट करंट' (एचव्हीडीसी) लाईन क्षमतेने बळ मिळाले आहे. त्यामुळे दूरवर मोठ्या प्रमाणात विजेचे कार्यक्षमतेने वहन करणे शक्य होते. तथापि, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये सुमारे १५ हजार 'सर्किट किलोमीटर'च्या उद्दिष्टाच्या तुलनेत केवळ ८,८३० सर्किट किलोमीटर नवीन पारेषण लाईन्स कार्यान्वित झाल्या. असे असले, तरी एकूण गरजेच्या हे प्रमाण जवळपास ४० टक्क्यांनी कमी आहे. आंतरराज्य पारेषण प्रणालीमध्ये (आयएसटीएस) झालेली वाढ एका दशकातील सर्वांत कमी आहे. अहवालात नमूद केले आहे की, ७१ टक्क्यांपर्यंत 'आयएसटीएस कॉरिडॉर' तीस टक्क्यांपेक्षा कमी क्षमतेने कार्यरत आहेत. जून २०२५ पर्यंत भारताची राष्ट्रीय ग्रीड पारेषण क्षमता अंदाजे एक लाख वीस हजार ३४० मेगावॅट होती. नऊ ट्रिलियनपेक्षा जास्त गुंतवणुकीने ही क्षमता एक लाख ६८ हजार मेगावॅटपर्यंत वाढवण्याची योजना आहे. तथापि, पारेषण पायाभूत सुविधांच्या विकासाचा वेग अक्षय ऊर्जा प्रकल्पांच्या कार्यान्वित होण्याच्या वेळापत्रकापेक्षा मागेच आहे. या विलंबाचे मुख्य कारण पारेषण प्रकल्पांशी संबंधित मंजुरी, भूसंपादन आणि नियामक परवानग्यांसाठी लागणारा जास्त वेळ हे आहे.

२०३० साठी भारताच्या पारेषण वाहिनी नेटवर्कच्या नियोजनाला विलंब आणि विसंगतींचा सामना करावा लागत आहे. त्याचे मूळ राज्यांनी घोषित केलेल्या नवीकरणीय ऊर्जा (आरई) क्षमतेमध्ये आणि विकसक मागत असलेल्या कनेक्टिव्हिटी क्षमतेतील तफावतीमध्ये आहे. ही विसंगती पारेषण प्रणालीचे नियोजन गुंतागुंतीचे करते. त्यामुळे अनेकदा विविध कॉरिडॉरमध्ये गरजांचा अतिअंदाज किंवा कमी अंदाज लावला जातो. परिणामी, अनेक वीजनिर्मिती प्रकल्प कनेक्टिव्हिटी असूनही पारेषणामधील अडथळे किंवा अवरुद्ध कॉरिडॉरमुळे पूर्णपणे वापर करू शकत नाहीत. याव्यतिरिक्त आगामी प्रकल्पांसाठी नवीन कनेक्टिव्हिटी मर्यादित आहे आणि हरित ऊर्जेच्या वहनासाठी पुरेशी पारेषण क्षमता उपलब्ध



होण्यापूर्वी दोन वर्षे किंवा त्याहून अधिक काळाचा विलंब अपेक्षित आहे. परिणामी, अनेक नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प रखडले आहेत किंवा त्यांच्या नियोजित क्षमतेपेक्षा कमी क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय निर्मितीची उद्दिष्टे साध्य करण्यावर परिणाम होत आहे.

'टॅरिफ-आधारित स्पर्धात्मक बोली' (टीबीसीबी) प्रणालीअंतर्गत विकसित केलेल्या पारेषण वाहिनी प्रकल्पांमधील एक प्रमुख आव्हान म्हणजे पारेषण परवान्याचा कालावधी (२५ वर्षे) आणि पारेषण सेवा करार (टीएसए) कालावधी (३५ वर्षे) यातील विसंगती. ही तफावत कर्जदात्यांसाठी जोखीम मूल्यांकन आणि आर्थिक वचनबद्धता गुंतागुंतीची करते. त्यामुळे प्रकल्पाच्या वित्तपुरवठ्यामध्ये अनिश्चितता येते. कर्जदात्यांना मार्गाधिकार संपादनातील विलंब, प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील संथपणा आणि वस्तूंच्या किमतींमधील चढ-उतार यासारख्या सततच्या समस्यांनाही सामोरे जावे लागते. प्रकल्पाच्या वेळापत्रकावर आणि आर्थिक व्यवहार्यतेवर या सर्वांचा परिणाम होतो. आयोगांकडून/सरकारी प्राधिकरणांकडून होणारा नियामक विलंब आणि मार्गाधिकारातील अडथळे प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करत आहेत, तर वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे बजेट अनेकदा सुरुवातीच्या अंदाजापेक्षा वाढते. हे घटक एकत्रितपणे कर्जदात्यांचा आत्मविश्वास कमी करतात आणि पारेषण पायाभूत सुविधांच्या विकासाचा वेग मंदावतात. तो नवीकरणीय ऊर्जानिर्मितीच्या वाढीशी सुसंगत राहण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

'सेंट्रल ट्रान्समिशन युटिलिटी ऑफ इंडिया लिमिटेड' (सीटीयूआयएल) ने २०२५ मध्ये सुमारे १७ गीगावॅट नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांची कनेक्टिव्हिटी रद्द केली. राजस्थान, गुजरात आणि मध्यप्रदेश यासारख्या नवीकरणीय ऊर्जेने समृद्ध राज्यांमधील विलंबित आणि रखडलेल्या प्रकल्पांना लक्ष्य करून ही कारवाई करण्यात आली. विजेच्या वाढत्या मागणीचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करण्यासाठी कार्यरत आणि पूर्णत्वाच्या जवळ असलेल्या प्रकल्पांना ग्रीडमध्ये प्रवेशासाठी प्राधान्य देणे हा यामागील उद्देश होता. पारेषण क्षेत्रात मार्गाधिकार (आरओडबल्यू) आव्हाने कायम असताना भारतामध्ये उद्योगक्षेत्रातील खेळाडूंना अतिरिक्त अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. ट्रान्सफॉर्मरसारख्या दीर्घ-प्रतीक्षा कालावधीच्या उपकरणांसाठी मर्यादित पुरवठा साखळी ही एक प्रमुख चिंता आहे, जिथे प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी वेळेवर वितरण महत्त्वाचे आहे. मोठ्या प्रमाणात वीज प्रेषणासाठी मर्यादित कॉरिडॉर उपलब्ध असल्याने 'हाय व्होल्टेज डायरेक्ट करंट' (एचव्हीडीसी) पारेषण नेटवर्कचा विस्तार करणे आवश्यक आहे. भारतातच 'एचव्हीडीसी'सारख्या नवीन तंत्रज्ञानाचे संशोधन आणि विकास करण्यास प्रोत्साहन देण्याची गरज आहे, कारण 'एचव्हीडीसी' प्रणालींच्या निर्मितीसाठी लागणारा वेळ जास्त असतो आणि भविष्यातील मागणी पूर्ण करण्यासाठी लवकर गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

राज्य पारेषण उपयुक्ततांची (एटीयू) भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. ती केंद्रीय पारेषण उपयुक्ततांच्या प्रयत्नांना पूरक ठरते. भविष्यात 'एसटीयू'ज आंतरराज्य पारेषण प्रकल्पांसाठी दर-आधारित स्पर्धात्मक बोली (टीबीसीबी) यंत्रणा स्वीकारतील, अशी अपेक्षा आहे. या बदलामुळे स्पर्धेला चालना मिळेल, खाजगी गुंतवणूक आकर्षित होईल आणि देशभरात पारेषण पायाभूत सुविधांचा वेगवान विकास शक्य होईल. सध्या देशाच्या नवीकरणीय ऊर्जेच्या महत्त्वाकांक्षेपुढे काही आव्हाने आहेत. धोरणात्मक गुंतवणूक, लक्षित नियामक सुधारणा, ग्रीन एनर्जी कॉरिडॉर आणि 'टीबीसीबी' प्रकल्पांसारख्या उपक्रमांच्या समन्वित अंमलबजावणीद्वारे भारत आपली पारेषण प्रणाली नवीकरणीय ऊर्जेसाठी एक मजबूत सक्षमकर्ता म्हणून रूपांतरित करू शकतो. यामुळे हरित ऊर्जेचे विश्वसनीय आणि कार्यक्षम वहन तसेच वापर सुनिश्चित होईल. त्यामुळे देशाला स्वच्छ ऊर्जा संक्रमणाच्या ध्येयांकडे जाण्यास मदत होईल. पायाभूत सुविधांमधील तफावत भरून काढण्यासाठी एकात्मिक नियोजन दृष्टिकोन स्वीकारण्याच्या बाबतीत देश योग्य मार्गावर आहे. रस्ते, रेल्वे, जहाज वाहतूक आणि नागरी विमान वाहतूक यासारख्या सर्व माध्यमांमधील वाहतूक धोरणांमध्ये समन्वय साधण्यासाठी एकात्मिक वाहतूक नियोजन संस्था (आयटीपीए) स्थापन करण्याचा भारत सरकारचा अलिकडील प्रस्ताव हे याचे उत्तम उदाहरण आहे. त्याचप्रमाणे ऊर्जा क्षेत्रातही, निर्मिती, पारेषण आणि वितरण या सर्व स्तरांवर क्षमता वाढवण्यासाठी एकात्मिक नियोजन दृष्टिकोन ही काळाची गरज आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# 'मानसिकते'चे दिव्यांगत्व!

आमचा स्वभावच आहे, ज्या ज्या मार्गाने जे काही मिळेल, ते ओरबडून घ्यायचं! मग शासकीय योजनांचा लाभ असो, वा एखाद्याच्या अधिकारावर गदा आणून आपला हक्क प्रस्थापित करण्याची विचित्र मानसिकता! शासकीय नोकरीमध्ये फोफावलेली ही मानसिकता आज उजागर होत आहे. शासकीय नोकरी म्हणजे पैसा, प्रतिष्ठा आणि सुरक्षितता असा सगळ्यांचा समज! पण ही सुरक्षितता जेव्हा अपात्र लोक 'कागदी' दिव्यांगत्व दाखवून लाटतात, तेव्हा व्यवस्थेचे 'आंधळेपण' चव्हाट्यावर येते! हे खऱ्या दिव्यांगांच्या जिद्द आणि हक्काला आलेले मरणच नव्हे का? पद, प्रतिष्ठा आणि पैसा कोणाला नको असतो! या तीनही गोष्टी ज्या माध्यमातून सहज मिळू शकतात, ती म्हणजे शासकीय नोकरी. आज शासकीय कार्यालयात साधी शिपायाची नोकरी सुद्धा समाजात

तोऱ्यात मिरविण्यासाठी पुरेशी आहे. काम नक्कीच कोणतेही कमीपणाचे नाही, पण त्यामुळे बदलणाऱ्या मानसिकतेवर बरेच काही अवलंबून असते. खाजगी क्षेत्रात नोकरी मिळावी म्हणून आज उलढाल करण्याची पुरेपूर तयारी दाखविली जात असेल तर शासकीय नोकरी मिळविताना कागदांची थोडीफार हेराफेरी केली तर काय फरक पडतो? ही मानसिकता बळावल्याने आज अपात्र पात्र झाले अन् खरे पात्र 'वंचित' राहत आहेत. दिव्यांगांच्या प्रमाणपत्र तपासणी मोहिमेच्या निमित्ताने शासकीय व्यवस्थेचा हा 'आंधळेपणा' पुढे येऊ लागला आणि सोबत स्वार्थी मानसिकताही!



महाराष्ट्रात २०११ च्या जनगणनेनुसार २९ लाख ६३ हजार ३९२ दिव्यांग आहेत. या दिव्यांगांची वेगवेगळ्या ७ प्रकारांत विभागणी आहे. अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मानसिक दुर्बल, मानसिक आजारी, इतर आणि बहुविकलांग अशा दिव्यांगांच्या शारीरिक, बौद्धिक संवेदनक्षम आणि विकासात्मक कार्यक्षमतेत वाढ करून समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांना आणण्यासाठी शासनाचे दिव्यांग कल्याण विभाग विविध योजना आणि उपक्रम राबविते. पण अशा दिव्यांगांना खरंच त्यांचे अधिकार किंवा हक्क मिळतात का? हा प्रश्नच आहे. दिव्यांग कल्याण आयुक्त तुकाराम मुंढे यांनी शासकीय नोकरी असलेल्या दिव्यांगांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्याचे फर्मान काढले आणि दिव्यांगांचे हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न करीत असलेल्या बोगस दिव्यांगांची धांदल उडाली. जानेवारी २०२६ अखेर जवळपास ७१९ दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याचे उद्दिष्ट होते. ४० टक्क्यांच्या आत दिव्यांगत्व ओढून आलेले अधिकारी, कर्मचारी हे बोगस म्हणून ओळखले जाऊ लागले आणि वास्तव पुढे आले. भंडारा जिल्ह्यातही आतापर्यंत १० अधिकारी, कर्मचारी बोगस म्हणून पुढे आले.

मानसन्मानासह महिन्याला पगार देणारी नोकरी, विविध लाभ असा सर्वतोपरी उपभोग घेणारे हे बोगस दिव्यांग महाभाग शासकीय व्यवस्थेच्या डोळ्यात अंजन घालणारे आहेत. पात्र नसतानाही स्वतःला खोट्या दस्तावेजांच्या आधारे पात्र करून घेत खऱ्या दिव्यांगांचा अधिकार ओरबडणारी ही मानसिकता बरेच काही सांगून जाते. ज्यांचे हातपाय सदृढ आहेत, कान तीक्ष्ण आहेत, दृष्टी 'दिव्य' आहे अशांनी खोटे प्रमाणपत्र देऊन नोकरी बळकविणे म्हणजे दिव्यांगांच्या व्यंगत्वाचा खेळ करण्यासारखे आहे. एकीकडे दिव्यांगांच्या कल्याणासाठी स्वतंत्र मंत्रालय आमचे शासन स्थापन करते. कल्याणकारी योजना आणते आणि दुसरीकडे स्वकल्याणाची भावना बोकाळलेल्यांकडून अशा पद्धतीने त्याला हरताळ फासला जातो, हे वेदनादायी आहे. आयुक्तांच्या फतव्याने हा सावळा गोंधळ पुढे येतो आहे. पण त्यातही स्थानिक पातळीवरील अधिकारी 'एकमेका साह्य करू'च्या भूमिकेत वावरताना दिसत आहेत. ज्याने शासनाला मूर्ख बनविले, त्यालाच जर पाठीशी घालताना वेगवेगळ्या सबबी दिल्या जाणार असतील तर एखाद्या प्रामाणिक अधिकाऱ्याच्या प्रामाणिकपणाची ही टिंगल करण्यासारखे आहे. प्रमाणपत्रांची फेरतपासणी ही बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे शासनाचे 'जावई' झालेल्या अनेकांसाठी अवघड जागेचे दुखणे झाले आहे. या दुखण्यावर आता खऱ्या अर्थाने इलाज करण्याची वेळ आली आहे. आज इलाज झाला नाही तर खऱ्या दिव्यांगांसोबत हा अन्याय असेल! हे करताना अशा 'ऐतखाऊ' महाभागांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. बदललेली मानसिकताच व्यवस्थेच्या आंधळेपणावर उपाय ठरू शकेल.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# विष्णुपुराण!

**प्रा. दिलीप जोशी**

विष्णुपुराण हे अठरा पुराणातील अत्यंत गोड पुराण असून ऋषी पाराशर आणि महामुनी जैमिनी यांच्यातील हा संवाद आहे. या पुराणात भारताचा इतिहास, भूगोल, भारतीय नैतिक, आध्यात्मिक शिक्षण, ज्योतिष आणि विविध कला याचे दर्शन आहे.

एकूण सहा अंश म्हणजे सहा भागांत विभाजित केलेले हे पुराण भगवान विष्णूंचे गुणगान करणारा विद्वत्प्रचुर ग्रंथ आहे.

ग्रंथाच्या प्रारंभीच मुनीश्रेष्ठ पाराशर ऋषींना त्यांचे परम् शिष्य महामुनी मैत्रेय साष्टांग दंडवत करून आपल्या काही शंका आणि प्रश्न विचारले.

**पाराशरं मुनीवरं कृतपौर्वाह्निकक्रियम् ।**
**मैत्रेयः परिप्रपच्छ प्रणिपत्याभिवाद्य च ।**

विशेष म्हणजे मैत्रेय ऋषींनी विचारलेले ज्ञान पाराशर ऋषींना आपले आजोबा वशिष्ठ महर्षी आणि महर्षी पुलस्त्य यांच्याकडून मिळाले असल्याने त्यांचे स्मरण पाराशर महामुनींना झाले.

**इति पुर्वं वसिष्ठेन पुलस्त्येन च धीमता ।**
**यद्युक्तं तत्स्मृतिं याति त्वत्प्रश्नादखिलं मम ॥**

त्या आनंदाने त्यांनी हे विष्णुपुराण मैत्रेय यांना सांगितले.

पहिल्या अंशात त्यांनी सृष्टीची उत्पत्ती, ब्रह्मांडाची रचना आणि त्या अनुषंगाने काही पौराणिक कथा सांगितल्या. दुसऱ्या अंशात पृथ्वीचे वर्णन, सप्तद्वीप, भारतवर्षाचे वर्णन, भूगोल आणि खगोल सांगितला. तिसऱ्या अंशात कालगणना, मन्वंतरादी आणि वेद धर्माचे वर्णन दिले आहे .चौथ्या अंशात सूर्यवंशी आणि चंद्रवंशी राजांची माहिती तर पाचव्यात भगवान श्रीकृष्णाचे व्यापक चरित्र दिले आहे. अखेर सहाव्या अंशात कलियुगाचे वर्णन, प्रलय वर्णन, त्रिविध ताप, ब्रह्मयोग इत्यादीचे वर्णन केले आहे.

विष्णुपुराणात प्रथम अंशात एकोणविसाव्या अध्यायात भक्त प्रल्हाद आणि त्यांचे पिता दैत्यराज हिरण्यकश्यपू यांचा संवाद चिंतनीय आहे.

दैत्यगुरू शुक्राचार्यांच्या आश्रमातून शिकून परत आल्यावर आपला पुत्र काय शिकला हे पाहण्यासाठी हिरण्यकश्यपूने पुत्र प्रल्हाद याला काही प्रश्न विचारले. त्यात राजाने आपल्या मित्रांशी, शत्रूंशी कसे वर्तन करावे? मंत्री, अमात्य, गुप्तचर इत्यादींप्रति कसा व्यवहार हवा? असे अनेक राजनैतिक प्रश्न त्याला विचारले. त्यावर प्रल्हादाचे उत्तर खूपच महत्त्वाचे आहे.

प्रल्हाद म्हणतात की, कृपया क्रोध करू नका, पण तुम्ही विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे जर दैत्यगुरू शुक्राचार्यांच्या नीतीने दिली तर ती नीती मला अजिबात मान्य नाही. जर

**सर्व भूतात्मके तात जगन्नाथ जगन्मये ।**
**परमात्मनि गोविंदे मित्रामित्रकथा कुतः ॥**

हे तात! तो जगन्नाथ सर्वव्यापी आहे तर शत्रू-मित्र आलेच कुठून?

हे सर्व अविद्येच्या प्रभावाने होत आहे.

या संवादातच सुप्रसिद्ध असा विद्येचा व्याख्या करणारा श्लोक आहे.

**तत्कर्म यन्न बन्धाय सा विद्या या विमुक्तये ।**
**आयासायापरं कर्म विद्यान्या शिल्पनैपुणम् ॥**

कर्म तेच जे माणसाला बंधमुक्त करते. विद्या तीच जी माणसाला जीवनमुक्त करते. बंधमुक्त न करणारे कर्म म्हणजे केवळ क्रियाकलाप होईल. विद्या जर जीवनमुक्त करीत नसेल तर ते केवळ नैपुण्य किंवा कौशल्य आहे. अनेक शिक्षण संस्थांचे ब्रीदवाक्य ''सा विद्या या विमुक्तये'' असते. ते याच पुराणातील आहे. भक्त प्रल्हाद आणि हिरण्यकश्यपू यांच्यातील हा संवाद खूपच सुंदर आहे. खरे तर दैवी विचार आणि दैत्य विचार यातील हा तात्त्विक वाद तेव्हाही होता जो आजपर्यंत सुरू आहे. पण विजय दैवी विचारांचाच तेव्हाही आणि आताही होणार हा दृढविश्वास हे पुराण देते.

याच पुराणातील तिसऱ्या अंशातील तिसऱ्या अध्यायात भारतवर्षाचे सुंदर वर्णन असून जगाला आम्ही किती प्राचीन आणि सभ्य आहोत हे पटवून देण्यासाठी विष्णुपुराण साहाय्यभूत आहे.

भारताचे वर्णन करताना सुप्रसिद्ध श्लोक आहे.

**उत्तरं यत् समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् ।**
**वर्षं तद् भारतं नाम भारती यत्र सन्ततिः ॥**

समुद्राच्या उत्तर दिशेला आणि हिमालयाच्या दक्षिण दिशेला पसरलेला सुंदर देश म्हणजे भारत असून त्यात राहणारे सर्व भारतीय हे भारतमातेची संतती आहे.

**नवयोजनसाहस्रो विस्तारोस्य महामुने ।**

भारताचा विस्तार नऊ हजार योजन असल्याचे या पुराणात स्पष्ट आहे.

भारतस्यास्य वर्षस्य नवभेदान्निशामय !

भारताचे नऊ भाग नावासह दिले आहेत ज्यात इंद्रद्वीप, कसेरू, ताम्रपर्ण इत्यादी नऊ नावे आहेत.

**अत्रापि भारतं श्रेष्ठं जंबूद्वीपे महामुने!**

जंबुद्वीपात भारत सर्वश्रेष्ठ असल्याचा उल्लेख आहे.

**धन्यास्तु ते भारत भूमिभागे !**

जे भारतात जन्मले ते धन्य आणि भाग्यवान आहेत.

''भारतं प्रथमं वर्षं'' मेरुपर्वतापासून भारत प्रथम स्थानावर असल्याचे हेच पुराण स्पष्ट करते.

**नमो ब्रह्मण्य देवाय गोब्राह्मण हिताय च ।**
**जगत् हिताय कृष्णाय गोविंदाय नमो नमः॥**

हा प्रसिद्ध विष्णुमंत्र याच पुराणातील आहे.

''ॐ नमो भगवते वासुदेवाय'' हा सिद्ध द्वादशाक्षरी मंत्र विष्णुपुराणाची देण आहे. या पुराणात कृषिशास्त्र, वाणिज्य आणि गोपालन यावर चर्चा आहे.

वास्तुरचनेत आजकाल काळाची गरज म्हणून शौचालय घरात असते. विष्णुपुराणानुसार शौचालय गावाच्या वेशीवरून जर बाण मारला तर तो ज्या अंतरावर जातो, गावकऱ्यांनी तितक्या लांब गावापासून दूर शौचासाठी जावे.

गृहस्थीचे नियम सांगताना अतिथी, गाय, वयोवृद्ध यांची सेवा, उधारी परतफेड, नीती नियम इत्यादींबाबत विष्णुपुराण मार्गदर्शन करते. एकादशीचे महत्त्व इथे आहे. समाजस्वास्थ्यासाठी विवाहाचे ब्राह्म, दैव, आर्ष, प्रजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस आणि पिशाच्च असे विविध आठ प्रकार या पुराणात आहेत. थोडक्यात, विष्णुपुराण विष्णुभक्ती, भक्ती आणि ज्ञान यांचा संगम आहे. अभ्यासकांनी विशेष अभ्यास करून भारतीय भूगोल, भारतीय संस्कृती, भारतीय विज्ञान आणि भारतीय ज्ञान परंपरा उजेडात आणावी ही माफक अपेक्षा.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### वाहनाचा आकार आणि संख्या यावर अंकुश हवा

नागपुरातील वाहतूक कोंडी, अपुरी पार्किंग व्यवस्था, रस्त्यांवरील वाहने यंत्रणेने उचलून नेणे आणि त्यातून होणारा भ्रष्टाचार यावरील वृत्त आता नित्यातेच झाले आहे. वाढती लोकसंख्या आणि रस्त्यांवर रोज येणारी नवी वाहने याला कारणीभूत आहेच. आता नागपुरात कोणत्याही वस्तीत चक्कर मारली तर बहुतांशी रस्त्यांवर, गल्लीबोळात रात्री वाहनांची रांग दिसेल. यावरूनच समस्या किती गंभीर होत चालली आहे हे लक्षात येते. एकाच कुटुंबात अनेक दुचाकी वाहने, एकाहून अधिक चारचाकी वाहने, कुटुंब लहान असले तरी मोठ्या आकाराचे वाहन ठेवण्याची टुम या गोष्टीही समस्येला हातभार लावतात. ठिकठिकाणी रस्त्यावर, गल्लीबोळात दिवसा फिरणारी, पार्क केलेल्या मोठ्या आकाराच्या वाहनांनी तेथील रहिवासी नागरिकांना होणारा वैताग यावर काय तोडगा आहे? आता सरकारनेच यावर तोडगा म्हणून एका कुटुंबात किती वाहने असावीत, मोठ्या आकाराच्या वाहनांना काही भागात प्रतिबंध, या बाबींवर नियम करणे आवश्यक आहे अन्यथा वाहतूक समस्या दिवसेंदिवस भीषण रूप धारण करेल. अशा समस्या न्यायालयीन लढाई किंवा आदेश यांनी सुटणार नाही हे नक्की.

**राम राजे**/९४२१७७९९४५

### व्यसनाधीन तरुणाई : सशक्त राष्ट्रनिर्माणात अडथळा!

दरवर्षी ४ फेब्रुवारीला जागतिक कर्करोग दिन साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश समाजात कर्करोगाविषयी जनजागृती निर्माण करणे हा आहे. कर्करोग हा आजच्या काळातील एक अत्यंत गंभीर आणि जीवघेणा आजार आहे. जगभरात दरवर्षी लाखो लोक या आजारामुळे मृत्युमुखी पडतात, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. कर्करोगाची अनेक कारणे असली तरी व्यसन हे कर्करोगाचे एक प्रमुख कारण आहे. तंबाखू, सिगारेट, गुटखा, खैनी, हुक्का, ई-सिगारेट, दारू तसेच विविध अमली पदार्थांचे सेवन केल्यामुळे तोंडाचा, फुफ्फुसांचा, घशाचा, यकृताचा इत्यादी कर्करोग होण्याचा धोका प्रचंड वाढतो. आजची भयावह वास्तविकता अशी आहे की, तरुण वर्ग (तरुण आणि तरुणी) मोठ्या प्रमाणावर व्यसनांच्या आहारी जात आहेत. किशोरवयापासूनच मुलांना व्यसनांची सवय लागत असल्यामुळे त्याचे दुष्परिणाम लवकर आणि अधिक तीव्र स्वरूपात दिसून येतात. केवळ क्षणिक आनंदासाठी ओढलेली सिगारेट पुढे जाऊन व्यसनात रूपांतरित होते आणि आयुष्यभराचा आजार देऊन जाते, ही वास्तविकता आहे. ताणतणावातून पळ काढण्याची वृत्ती, चुकीची फॅशन, मित्रांचा दबाव, पालकांचे दुर्लक्ष तसेच समाजातील चुकीचे आदर्श ही व्यसनाधीनतेची प्रमुख कारणे आहेत. यामुळे अनेक तरुणांचे आरोग्य, शिक्षण आणि भविष्य धोक्यात येत आहे. आजचा तरुण वर्ग जर व्यसनांच्या आहारी जाऊन भरकटत असेल, तर देशाच्या भविष्याचे काय होणार? अत्यंत गंभीर असा हा प्रश्न आहे. एक पालक, शिक्षक आणि जबाबदार नागरिक म्हणून आपण किती सजग आहोत, याचे आत्मपरीक्षण प्रत्येकांनी करायला हवे. या दिवसाच्या निमित्ताने तरुणांनी व्यसनांपासून दूर राहण्याची, सकारात्मक विचारसरणी स्वीकारण्याची आणि आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्याची शपथ घेऊन त्यानुसार कृती करायला हवी. सुदृढ तरुणाईच सशक्त राष्ट्राची खरी ताकद आहे. म्हणूनच व्यसनमुक्त तरुण आणि निरोगी समाज घडवणे ही काळाची गरज आहे.

**वर्षा आवदे**/नागपूर

### निवडणुका झाल्या, आता विकासाचे बघा..

राज्यात मनपा निवडणुका पार पडल्या. काही ठिकाणी महापौरही विराजमान झालेत. निवडणुकीपुर्वी विविध राजकीय पक्षांनी आपापले जाहीरनामे जनतेसमोर ठेवले होते. आता त्या जाहीरनाम्यांची पूर्तता करण्याची वेळ आली आहे. स्वच्छ, सुंदर, स्मार्ट शहराची स्वप्ने दाखवणाऱ्यांना आता त्याचा विसर पडू नये म्हणजे झाले. नाहीतर सत्ताधारी केवळ सत्ता उपभोगतात आणि विरोधक फक्त आंदोलने करतात. यात मात्र सामान्य जनता भरडली जाते. आपल्या वॉर्डातील रस्ते, नाल्या नियमित स्वच्छ होतात का? रस्त्यांवरील पथदिवे रोज लागतात का याचे खरं तर नियमित ऑडिट होणे गरजेचे आहे. किंबहुना प्रत्येक नागरिकाचा यात सहभाग असावा.

प्रत्येक प्रभागात अशी एक तक्रारपेटी असावी जिथे सामान्य नागरिक आपली तक्रार लिहून त्यात टाकू शकेल व त्या तक्रारीची दखल घेतली जावी. अशी साधी, सरळ व्यवस्था खरंच उभारता येणार नाही का? पण कोण घेईल ती जबाबदारी त्यापेक्षा जसे आहे तसे चालू द्या, खरं तर हीच मानसिकता विकसित भारताच्या संकल्पात बाधा निर्माण करणारी आहे. आता बघूया पुढील पाच वर्षे कोण काय काम करतो ते. पण सत्ताधाऱ्यांनो आणि विरोधकांनो, एक लक्षात असू द्या, राजकारणात कुणीही अमरपट्टा घेऊन येत नाही तेव्हा पदापेक्षा सेवेचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवा. भारतमातेची सेवा करण्याचं भाग्य तुम्हाला लाभलंय, हे लक्षात ठेवा.

**अखिल देशपांडे**/अकोला

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद ३०५ एकर क्षेत्रात फळबाग लागवड कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ फेब्रुवारी**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढविण्याच्या उपक्रमांना शासन प्रोत्साहन देत आहे. शासनाच्या शाश्वत व दीर्घकालीन उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण व्हावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध योजना राज्यात लागू केल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला विविध माध्यमातून प्रतिसाद प्राप्त झाला आहे. असाच एक शाश्वत उत्पादन देणारा फळबागेचा पथदर्शी प्रकल्प बीड जिल्ह्यात ३५० एकर क्षेत्रावर येत्या काळात साकारणार आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनानुसार हरित वृक्षलागवड वाढवून शेतकऱ्यांना बळकटी देण्यासोबतच पर्यावरणीय समतोल राखण्या साठी हर्बालाईफ कंपनीने सामाजिक बांधिलकी उत्तरदायित्व अंतर्गत पुढाकार घेतला असून याला फामर्स फॉर फॉरेस्ट या संस्थेने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.या अंतर्गत जिल्हयात पडीक जमीन विकास तसेच वृक्ष लागवड आणि संवर्धन यासाठी ३०५ एकर वर फळबाग व देशी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. यासाठी १.५ कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे.याबाबत हर्बालाइफ (कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व निधी) आणि फार्मर्स फॉर फॉरेस्ट यांच्यात सहकार्य करार नुकताच झाला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शन

पर्यावरणाचा समतोल राखणे तसेच शेतकऱ्यांचे शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढवणे ही सद्यस्थितीत अत्यंत महत्त्वाची बाब ठरत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने विविध पर्यावरणपूरक व शाश्वत शेतीविषयक उपक्रम सुरू केले आहेत. या प्रयत्नांना बळ देण्यासाठी, अधिकाधिक शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा, शेतीतून मिळणारा मोबदला वाढावा, दीर्घकालीन शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण व्हावा आणि त्यासोबत पर्यावरण संरक्षणालाही चालना मिळावी, या उद्देशाने हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.या उपक्रमाचा मुख्य उद्देश जैवविविधतेचे क्षेत्र वाढविणे तसेच शेतकऱ्यांस दीर्घकालीन उत्पन्न देणारी फळबाग व वृक्षलागवड करण्यास प्रोत्साहन देणे हा आहे.या उपक्रमांतर्गत बीड आणि पुणे जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या पडीक, कमी कस व शेतजमिनींवर वृक्षलागवड व संवर्धनाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये आंबा, लिंबू, संत्रा, मोसंबी, आवळा, जांभूळ, चिंच यांसह विविध प्रकारची उत्तम कलम केलेली फळझाडे तसेच अनेक देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. तसेच बागेचे योग्य व्यवस्थापन करून विविध प्रकारची आंतरपीके घेऊ शकतात.

अर्थात कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर

या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांना अनुदान तत्वावर दर्जेदार कलमी रोपे, देशी झाडांची रोपे, ठिबक सिंचन संच, माती परीक्षण, सेंद्रिय खते तसेच फळबाग लागवडीसाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन पुरविले जाते. या संपूर्ण कार्यक्रमाची अंमलबजावणी 'फार्मर्स फॉर फॉरेस्ट' संस्था करत आहे. लागवडीनंतरही शेतकऱ्यांना सातत्यपूर्ण तांत्रिक सहाय्य देण्यासाठी विशेष यंत्रणा या संस्थेने उभारली आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षातही शेतकऱ्यांना खतांचा पुरवठा करण्यात येणार आहे. तसेच लागवड झालेल्या झाडांची देखरेख व वाढ नोंद करण्यासाठी ड्रोनद्वारे छायाचित्रे, उपग्रह डेटा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता चा वापर करून डिजिटल निरीक्षण प्रणाली राबवली जाणार आहे. माती परीक्षण तसेच फळबाग लागवडीच्या विविध टप्प्यांवर घ्यावयाच्या आवश्यक काळजीविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वेगवेगळ्या वेळेला डिजिटल कार्यशाळा आयोजित केल्या जातील. यासोबतच विविध माध्यमांचा वापर करून सातत्यपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन आणि माहिती पुरवली जाणार आहे.

फळबागेसह कार्बन क्रेडिट द्वारे उत्पन्नाचा लाभ

यासोबतच हा उपक्रम मातीची सुपीकता वाढविणे, कार्बन शोषण वाढविणे आणि स्थानिक जैवविविधतेचे संरक्षण करणे यासाठीही उपयुक्त ठरणार आहे. सदरील फळबागा भविष्यात कार्बन क्रेडिट मार्केटशी संलग्न करण्यात येणार असून, फळ उत्पादनातून मिळणाऱ्या उत्पन्नासोबतच कार्बन क्रेडिटच्या माध्यमातूनही अतिरिक्त उत्पन्नाचा पर्यायी स्त्रोत उपलब्ध होईल. तसेच ग्रामीण भागात हरित रोजगाराच्या संधी निर्माण होतील. हा उपक्रम पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत शेती विकासासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# बीड जिल्हयामध्ये इयत्ता १० वी व इ.१२ वी परीक्षेसाठी कॉपीमुक्त अभियान राबवावे-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ फेब्रुवारी**

दक्षता समितीची बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आली. या बैठकीसाठी सर्व समिती सदस्य उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीव्दारे तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गखोलीत उउढत कैमेरे बसवून ते कार्यान्वयीत करावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावर आवाजाचे रेकॉर्डीग होणारे उउढत कैमेरे बसवावेत, त्याची तपासणी तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी पुढील दोन दिवसात करावी व त्याचा अहवाल सादर करावा, तसेच उउढत कैमे-यांचे ॲक्सेस जिल्हास्तरावर कंट्रोल रुम स्थापन करून तेथे घेण्यात यावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावरील आणि ज्या परीक्षा केंद्रातील वर्ग खोलीमध्ये उउढत कॅमेरे नसतील, तेथील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित इतर कर्मचारी यांची अदलाबदल करावी, परीक्षाकेंद्रावर नियुक्त कर्मचा-या व्यतीरिक्त इतर कर्मचारी तसेच व्यक्तीना प्रवेश देऊ नये, इतर कर्मचारी परीक्षा केंद्रावर आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर अनुदानित, अंशतः अनुदानित व जिल्हा परिषदेचे शिक्षक व इतर कर्मचारी नेमावेत, परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांसाठी ओळखपत्र अनिवार्य करण्यात यावे, तालुकास्तरावरुन महत्वाच्या पेपरला वर्ग १ च्या अधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रांना भेटी द्याव्यात.बीड जिल्हयामध्ये कॉपीमुक्त अभियान राबवून जिल्हा कॉपीमुक्त होण्याच्या दृष्टीने संबधित यंत्रणेने प्रयत्न करावेत, तसेच संवेदनशील परीक्षा केंद्रावर जास्तीत जास्त लक्ष ठेवून परिक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी संबधित अधिकारी. कर्मचा-यानी लक्ष द्यावे असेही श्री. जॉन्सन या प्रसंगी म्हणाले.

या तउ बैठकीस संबधित अधिकारी उपस्थित होते.

बीड जिल्हयामध्ये मंडळातर्फे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रुवारी मार्च-२०२६ आयोजित केल्या आहेत. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा दि.१०फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दि.२० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत.

फेब्रुवारी/मार्च-२०२६ चे सुयोग्य प्रकारे संचालन व्हावे, परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये यासाठी महाराष्ट्र शासन मुख्य सचिव यांनी दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी दूरचित्र प्रणालीव्दारे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच परीक्षेशी संबंधित अधिका-यांची बैठक घेवून सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये जिल्हा स्तरावर दक्षता समितीची बैठकः आयोजीत करून प्रत्येक परीक्षा केंद्रावर उउढत कैमेरे बर्सावणे, संवेदनशील परीक्षा केंद्रावरील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व इतर कर्मचारी यांची अदलाबदल करणे, बैठे पथक व भरारी पथक नियुक्त करणे याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

जिल्हा स्तरावर दक्षता समिती गठीत करण्यात आलेली आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन अध्यक्ष, पोलीस अधिक्षक नवीनीत कॉवत सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, जितिन रहेमान सदस्य, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण सदस्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सदस्य, प्राथमिक शिक्षणाधिकारी सदस्य योजना शिक्षणाधिकारी सदस्य, माध्यमिक शिक्षणाधिकारी सदस्य सचिव आहेत.

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दि.२७ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सर्व गटविकास अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामस्तरावर कॉपीमुक्त अभियानाची जनजागृती करावी तसेच गटशिक्षणाधिकारी यांनी सर्व शाळामध्ये मुख्याध्यापक व पालक यांना परीक्षेसंबंधित कॉपीमुक्त अभियानाची माहिती दयावी. आकाशवाणी व इतर प्रसार माध्यमांमध्ये कॉपीमुक्त अभियानाची प्रसिध्दी देण्यात यावी भरारी पथकांनी इंग्रजी, गणित व विज्ञान इत्यादी महत्वाच्या विषयांच्या पेपरच्या दिवशी संवेदनशील केंद्रांना भेटी द्याव्यात. परीक्षेचे चित्रीकरण ड्रोन कॅमेऱ्याद्वारे करावे. पोलीस विभागा मार्फत सर्व परिरक्षक कार्यालय व परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्यात यावा अशा सूचना त्यांनी दिलेल्या होत्या.

परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहे, तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परीसरात प्रतिबंधात्मक उपायोजना लागू करण्यात येणार असून परीक्षा केंद्रावर गैर प्रकार घडल्यास गैरप्रकारांना प्रोत्साहीत करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्गाचा अवलंब करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.जिल्हा दक्षता समितीने इ.१० व १२ वी च्या परीक्षा शांततेत व तणावमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढ होण्याच्या दृष्टीने जिल्हाभर कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबतच्या उपाययोजना केलेल्या असून मुलांच्या शिक्षणाचा पाया मजबूत होण्यासाठी कॉपीमुक्त अभियान महत्वाची भूमिका असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले.

# नादब्रह्म संगीत विद्यालयाचा आयुष थिगळे तबला विशारद पुर्ण परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ फेब्रुवारी**

येथील नादब्रह्म संगीत विद्यालयाचा विद्यार्थी आयुष रविंद्र थिगळे अ.भा.गां.मंडळ, मुंबई या संस्थेद्वारे घेण्यात आलेल्या डिसेंबर -२०२५ सत्रातील तबला विषयाच्या विशारद पुर्ण परीक्षेत ५२० गुणांसह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे.बालपणापासुनच आयुषला तबला वादनाची आवड होती.त्याचे विशारद पुर्ण पर्यंतचे तबला वादनाचे शिक्षण नादब्रह्म संगीत विद्यालयात गुरुवर्य प्रा.महेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.तबला वादनासोबतच आयुष थिगळे सध्या पुणे येथे नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात द्वितीय वर्षाचे शिक्षण घेत आहे.उच्य शिक्षण आणि कला या दोन्हींचा त्याने उत्तम समन्वय साधला आहे.त्याच्या या यशाबद्दल सांगितिक क्षेत्रातील मान्यवर , संगीत साधक तसेच परिवारातील सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



या वर्षी राजमा पीक मोठ्य प्रमाणात शेत

# श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर बार्शी रोड बीड येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ फेब्रुवारी**



बीड शहरातील नामांकित असलेल्या बार्शी रोडवरील श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन या ठिकाणी सालाबाद प्रमाणे याही वर्षी अतिशय थाटामाटा मध्ये आणि मोठ्या धुमधडाक्यात महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकाराच्या कीर्तनाने या ठिकाणी सप्ताह सुरुवात होणार आहे तरी पंचक्रोशीतील सर्व बीड जिल्ह्यातील सर्व भाविक भक्तांनी येथे होणाऱ्या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष नवनाथ शिराळे पाटील व सर्व विश्वस्त यांनी केले आहे या सप्ताह मध्ये होणाऱ्या सर्व कीर्तनकाराचे कीर्तन खालील प्रमाणे आहे

# यशवंत मस्के याचे इंग्लिश ओलंपियाडमध्ये यश

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.४ फेब्रुवारी**




येथील सिंदफणा शाळेतील वर्ग सहावीचा विद्यार्थी यशवंत एकनाथ मस्के याने नुकत्याच झालेल्या एसओएफ इंग्लिश ओलंपियाड परिक्षेमध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे.

शहरातील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्रा. एकनाथ मस्के यांचा मुलगा यशवंत मस्के याने या कठिण असलेल्या इंग्लिश परिक्षेत सलग यश मिळविले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचा शाळेत प्राचार्य अन्वर शेख यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व मेडल देउन सन्मान करण्यात आला तर उपप्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# छत्रपती संभाजीनगरकरांसाठी हक्काचे 'हेल्थ डेस्टिनेशन' 'अर्थ वन' प्रकल्पाची डॉ. मिकी मेहतांशी हातमिळवणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ फेब्रुवारी**

छत्रपती संभाजीनगरकरांसाठी पर्यटनाचे आणि आता गुंतवणुकीचे सर्वात जवळचे केंद्र ठरलेल्या इगतपुरीतून एक मोठी आरोग्यदायी बातमी समोर येत आहे. पश्चिम घाटातील निसर्गरम्य ५० एकर परिसरात पसरलेल्या युनायटेड बिल्डर्स आणि ललित रूंगटा ग्रुप यांच्या 'अर्थ वन' या प्रिमियम प्रकल्पाने जागतिक कीर्तीचे होलिस्टिक हेल्थगुरू डॉ. मिकी मेहता यांची 'होलिस्टिक लिव्हिंग म्बेसेडर' म्हणून घोषणा केली आहे.



समृद्धी महामार्गामुळे छत्रपती संभाजीनगर आणि इगतपुरीमधील अंतर कमी झाले असतानाच, आता या भागात केवळ जमीनच नाही तर परिपूर्ण आरोग्य देणारी जीवनशैली अनुभवण्याची संधी या निमित्ताने उपलब्ध झाली आहे.

हा प्रकल्प एक आरोग्याची मोठी चळवळ ठरणार आहे. भारतातील समग्र आरोग्याचे प्रणेते डॉ. मिकी मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प 'तुम्ही जिथे राहता, तिथेच तुमचे आरोग्य सुधारते' या संकल्पनेवर आधारित असेल. विशेषतः घाईघाईच्या शहरी जीवनातून विश्रांती शोधणाऱ्यांसाठी दारणा बॅकवॉटर्सजवळील हा प्रकल्प एक वरदान ठरणार आहे. युनायटेड बिल्डर्स आणि ललित रूंगटा ग्रुप यांच्या भागीदारीतून साकारलेला हा प्रकल्प रिअल इस्टेटमध्ये 'वेलनेस'चा नवा मापदंड प्रस्थापित करत आहे.

डॉ. मिकी मेहता यांच्या मते, इगतपुरीमधील हवेची गुणवत्ता, मोकळे आकाश आणि इथली नैसर्गिक उर्जा मानवी शरीराच्या शारीरिक, भावनिक आणि आध्यात्मिक कल्याणासाठी अत्यंत पोषक आहे. प्रकल्पाच्या केंद्रस्थानी असलेला 'अर्थ वन क्लब' हा समुदायाला एकत्र आणण्यासाठी आणि जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी सज्ज आहे झाला असून छत्रपती संभाजीनगरमधील गुंतवणूकदारांसाठी हे ठिकाण 'सेकंड होम' म्हणून पसंतीस उतरत आहे.

इगतपुरी हे सध्या महाराष्ट्रातील गुंतवणुकीचे सर्वात मोठे केंद्र बनले असून समृद्धी महामार्गामुळे मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र यांच्यातील कनेक्टिव्हिटी वाढली आहे. निसर्ग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा हा मेळ डॉ. मेहता यांच्या तत्त्वज्ञानाशी तंतोतंत जुळत असल्याने, आरोग्य आणि गुंतवणूक या दोन्ही पातळ्यांवर हा प्रकल्प सरस ठरत आहे.

# सोन्नाथडी येथे स्व.अजित दादाचा पुतळा उभारण्याचा शोकसभेत संकल्प

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.४ फेब्रुवारी**

तालुक्यातील सोन्नाथडी येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना सोमवार रोजी मुंबई बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांच्या उपस्थितीत शोकसभा आयोजीत करुन भावपूर्ण श्रृदांजली अर्पण करण्यात येवुन लवकरच स्व.अजित दादा यांचा पुतळा उभारण्याचा निर्धार या शोकसभेत करण्यात आला.



राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे दि. २८ जानेवारीला बारामती येथे विमान आपघातात निधन झाले. त्यांच्या निधनाने राज्यभर शोककळा पसरली असुन शासनाच्या वतीने तिन दिवसांचा दुखवटा जाहिर करण्यात आला होता. दि.२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वा ग्रामपंचायत कार्यालय सोन्नाथडी येथे माजी सभापती अशोक डक, सरपंच विनय डक यांच्या उपस्थितीत परिसरातील नागरिकांच्या वतीने अजितदादा यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, सर्व संघटनेचे पदाधिकारी यांनी उपस्थिती लावली.या वेळी सभापती अशोक डक यांनी दादाच्या आठवणी विशद केल्याने अनेकांच्या भावनेचा बांध फुटला.तर अनेक ग्रामस्थानीही यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. संपुर्ण महाराष्ट्र चे प्रेरणादायी नेतृत्व असलेल्या अजित दादाचा पुतळा सोन्नाथडी येथे लवकरच उभारण्याचा निर्धार यावेळी शोकसभेत करण्यात आला.या शोकसभेस भाऊसाहेब वगरे, अशोकराव कावळे, गिननदेव वाघमारे,काशिनाथ शिंदे,अशोकराव काटकर,बालाजी वगरे, सतीश देवगुंदे सर, रघुनाथ डाके, जानकीराम पवार, बंडू पंत शिंदे,अनिल राव देशमुख,समाधान देवकते,शरद शिंदे,विष्णु गोरे,माऊली गोरे,नारायण गिरी,अशोकराव काकडे,बळीराम काळे,बळीराम कोकाटे व इतर कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# मंदिरात चोरी, बार शॉपी फोडणाऱ्या दोघांना स्थागुशाने केले जेरबंद

## आरोपींकडून १ लाख ६० हजारांचा मुद्देमाल केला जप्त



**अवैध वाळू वाहतुक करणारे ट्रॅक्टर पकडले**

अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या पथकाने खरबी येथील कयाधू नदीच्या पात्रातून अवैधपणे वाळू वाहतुक करणारे ट्रॅक्टर पकडले आहे. यावेळी पळून जाण्याचा प्रयत्न करणारा शिवा दादाराव काळे यास पथकाने पकडले आहे मात्र चालक सुधाकर दिपके हा फरार झाला असून पोलिस चालकाचा शोध घेत आहे. पोलिसांनी १ ब्रास वाळूसह ट्रॅक्टर असा एकूण ६ लाख पाच हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरील कामगिरी जमादार पवार, टाले, नरवाडे, कुटे यांनी केली आहे.

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ फेब्रुवारी**

हिंगोली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पेट्रोलिंग करीत असतांना मिळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे मंदिरात चोरी करणाऱ्या तसेच बार शॉपी फोडणाऱ्या दोन आरोपींना मोठ्या शिताफीने जेरबंद केले असून आरोपींकडून १ लाख ६० हजार ३५० रूपयांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात मालाविरूध्दच्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेतल्या जात आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रात्री कळमनुरी पोलिस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मिळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे आरोपी चंद्रकांत कामाजी कुरूडे, सुभाष कामाजी कुरूडे रा घोळवा ता कळमनुरी यांनी मिळून औंढा नागनाथ आणि कळमनुरी पोलिस ठाणे हद्दीत बार फोडून चोरी केली आहे. तसेच आखाडा बाळापूर पोलिस ठाणे हद्दीतील कांडली येथील मंदिरात चोरी केली आहे. या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन्ही आरोपींना मोठ्या शिताफीने ताब्यात घेवून अधिक चौकशी केली असता आरोपींनी औंढा नागनाथ, कळमनुरी आणि आखाडा बाळापूर हद्दीत चोरी केल्याचे कबुल केले आहे. पोलिसांनी आरोपींकडून रोख रक्कम तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण १ लाख ६० हजार ३५० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरील कामगिरी सपोनि शिवसांब घेवारे, उपनि माधव जिव्हारे, अंमलदार कोंडबा मगरे, लिंबाजी वाव्हळे, सुभाष घुगे, विक्की कुंदनानी, शेख शकील, सतीश जाधव, किशोर सावंत, विशाल खंडागळे, दत्ता नागरे, मारोती काकडे, प्रदीप झुंगरे, इरफान पठाण, प्रतिभा मोरे यांनी केली आहे.

# सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अभियंता यांच्या वादात पळशीकर पिण्याच्या पाण्यापासून वंचीत

## तत्काळ पाणी वितरण सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ फेब्रुवारी**

सेनगाव तालुक्यातील पळशी येथे जलजीवन मिशन अंतर्गत दोन विहीरींचे काम पूर्ण झाले असून विहीरीस भरपूर पाणी लागले आहे. विहीरीपासून टाकीपर्यंत राइझिंग मेनची कामे पूर्ण झाली आहेत. टाकीपासून गावापर्यंत वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण झाले आहे परंतु सरपंच, कार्यरत ग्रामपंचायत सदस्य आणि अभियंता यांच्या वादामध्ये पळशी ग्रामस्थांना नळाद्वारे पाणी मिळत नसून या संदर्भात माजी जिल्हा परिषद सदस्य गजानन देशमुख यांच्यासह जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले असून त्यामध्ये तत्काळ पाणी वितरण सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, पळशी जलजीवन मिशन योजनेंतर्गत दोन विहीरींचे काम पूर्ण झाले आहे. या विहीरींना भरपूर पाणीसुध्दा आहे. विहीरीपासून राइझिंग मेनचे काम पूर्ण झाले आहे. टाकीपासून गावापर्यंत वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण झाले आहे. अस्तित्वात असलेल्या जलकुंभात पाणी आले आहे. गावामधील वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण पाईप व इतर नळ जोडणीचे पूर्ण साहीत्य गुत्तेदाराने गावात आणले आहे. वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण करण्यासाठी नकाशा मार्क आऊट टाकून देण्यात यावे अशी लेखी मागणी गुत्तेदाराने पाणी पुरवठा विभागाकडे केली परंतु पाणीपुरवठा विभागाचे अभियंता गुत्तेदारास वितरण व्यवस्थेचे काम सुरू करू देत नाही. यासंदर्भात गावकऱ्यांनी संबंधित अभियंत्यास जाब विचारला असता गावातील सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य काम सुरू करू नका असे सांगत असल्याचे सांगितले.

याबाबत गावकऱ्यांनी अधिक चौकशी केली असता सध्या लोकसंख्येप्रमाणे गावामध्ये ८० हजार लिटर पाणी क्षमतेची टाकी अस्तित्वात आहे. सदर जलकुंभ मधून पाणी वितरण व्यवस्था गावापर्यंत केली आहे परंतु भविष्यात वाढीव लोकसंख्येचा विचार करून एक अतिरिक्त ५० हजार लिटर क्षमतेचा जलकुंभ सध्या अस्तित्वात असलेल्या जलकुंभाजवळ मंजूर केला आहे. त्याचेही काम सुरू करण्यासाठी गुत्तेदाराने वारंवार लेखी पत्र पाणी पुरवठा विभागाला दिले आहे. परंतु पळशी ग्रामपंचायतीने सध्या कार्यरत असलेल्या ग्रामपंचायत सदस्य यांच्या मालकीच्या शेतात अतिरिक्त जलकुंभ घेण्यासाठी ठराव घेवून पाणीपुरवठा विभागास दिला आहे. प्रत्यक्षात प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळालेल्या अंदाजपत्रकात सध्या अस्तित्वात असलेल्या जलकुंभाजवळ अतिरिक्त जलकुंभ मंजूर आहे. कार्यरत ग्रामपंचायत सदस्य त्यांच्या मालकीच्या शेतात जलकुंभ घेण्यासाठी दबाव टाकत असून सामान्य गावकरी पाण्यापासून वंचीत राहत आहेत. याप्रकरणी योग्य ती कार्यवाही करावी व पाणी वितरण व्यवस्थेचे काम तत्काळ सुरू करावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे कार्यकर्त्यांनी घेतले दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ फेब्रुवारी**



राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे लोकप्रिय व डायनामिक उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांचं विमान अपघातात २८ जानेवारी रोजी दुखत निधन झाल्यामुळे संपूर्ण राज्यात दु:खाचे चावट पसरलेले आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली म्हणून हिंगोलीत अजितदादांच्या अस्थिकलशाचे २ फेब्रुवारी रोजी आगमन झाले असता ३ फेब्रुवारी रोजी वसमत, कळमनुरी, औंढा नागनाथ येथे अस्थी कलशाचे दर्शन झाल्यानंतर हिंगोली शहरातील व सेनगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांना अजितदादांच्या अस्थीकलशाचे दर्शन घ्यावे, याकरिता हिंगोलीतील गांधी चौक येथे कार्यकर्त्यांनी अभिवादन करून दर्शन घेतले. त्यानंतर नरसी नामदेव येथे कयाधू नदी तीरावर विसर्जन देखील करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बि.डी. बांगर आणि प्रदेश चिटणीस प्रकाश थोरात माजी नगराध्यक्ष दिलीपदादा चव्हाण, डॉ दिलीप मस्के, डॉ वसंत मस्के बाजीराव सवडकर, कळमनुरी माजी उपनगराध्यक्ष नाझिम रिझवी, बालाजी घुगे, कैलासराव खिल्लारे, अफजल, शिवाजी शिंदे, नगरसेवक खय्युम, सुखदेव बलखंडे, पंकज बांगर, विकास शिंदे, नगरसेवक अमित कळासरे, विलास आघाव, पुरुषोत्तम झाडे यांच्यासह अनेक राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**हिंगोली– महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग संचालनालयच्यावतीने वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवात पारंपारीक जागरण गोंधळ सादर करतांना नारायणराव धोंगडे, देविदास धोंगडे, शामराव धोंगडे, आनंद धोंगडे, सुभाष धोंगडे, पांडुरंग धोंगडे, प्रेम धोंगडे, रंगनाथ बिडवे, अनिल शिर्के, शिवराम बामणे, वंदना खरात, सौ रूक्मीणी शामराव धोंगडे दिसत आहेत. छाया– अहेमद पठाण, शिरड शहापूर**

## संक्षिप्त वृत्त

### डॉ बगडीया, ॲड बांगर यांचा सत्कार



हिंगोली– योग प्रचाराच्या कार्यामध्ये सतत सक्रियपणे मदत करणारे डॉ. मनीष बगडिया यांचा जन्मदिवसानिमित्त तर पतंजलीचे लीगल सेल जिल्हा प्रभारी ॲड एकनाथ बांगर यांची वकील संघ हिंगोलीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अथर्वलॉन श्रीनगर नियमित योग वर्गात सत्कार करण्यात आला. यावेळी पतंजली भारत स्वाभिमान चे जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके या कोषाध्यक्ष उमेश तोष्णीवाल यांच्यासह बालाजी वजीरे, राजेश अग्रवाल, वामन टाकळगव्हाणकर, गजानन देशमुख, सुनील गुंडेवार, रूपाली गुंडेवार, मनीषा तोष्णीवाल, छाया कोल्हे, अर्चना खंदारे, सुषमा होकरणे, सुनिता जयस्वाल पुष्पा कावरे, अनिता सावके, चव्हाण ताई,करुणा आचलिया, विद्या मोरे, कौशल्या कऱ्हाळे, रंजना शहाणे आदी सह सर्व पतंजली पदाधिकारी व साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राजे संभाजीमध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



हिंगोली–कै. ॲड. ग्यानबारावजी सेवाभावी संस्था संचलित राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पंडित अवचार हे होते प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव पंडित शिरसाट, संचालक सुधाकर मेटकर, कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून दामिनी पथक सह पोलीस निरीक्षक सौ.प्रेमलता जगताप या होत्या त्याचबरोबर प्रमुख मार्गदर्शक म्हणून अक्षय देविदास राठोड, विजयकुमार कांबळे, रवी शिरसाट, विशाल इंगळे, आरती सावळे, सरनाईक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीक्षा घायाळ, स्वाती काळे या विद्यार्थ्यांनी केले. प्रस्ताविक प्राचार्य यु एस शेळके यांनी केले. यावेळी मान्यवरांच्याहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात पंडित अवचार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन शिवशंकर डोलारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. संदीप जाधव, प्रा. ज्ञानेश्वर शिरसाट, प्रा. इरफान शेख, प्रा. सौ मनीषा बोरकर, शशिकांत बोरकर, ओम इंगोले व इमरान शेख, अर्चना नरवाडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# शिवजयंती निमित्त बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीनिमित्त येथील हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे यांनी पोलिस पाटील यांची बैठक घेतली. यावेळी शिवजयंती निमित्त गावात कायदा व सुव्यवस्था राखण्यात यावी, गावात शिवजयंती शांततेत साजरी करावी तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, कायद्याचा भंग करणाऱ्यांवर कडक नजर ठेवावी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका लक्षात घेता अशा लोकांवर लक्ष ठेवावे असे आवाहन केले. यावेळी डीएसबीचे कर्मचारी तसेच पोलिस कर्मचारी, तालुक्यातील पोलिस पाटील यांची उपस्थिती होती.

# हिंगोलीत सार्वजनिक शिजयंती महोत्सवानिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ फेब्रुवारी**



येथील सार्वजनिक शिवजयंती महोत्सवानिमित्त भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ११ ते १९ फेब्रुवारी पर्यंत दररोज विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. यामध्ये होम मिनिस्टर, कवि संमेलन, वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, सांस्कृतीक कार्यक्रम यासह क्रिकेट स्पर्धा, व्हॉलीबॉल, लॉन टेनिस, मॅराथॉन, शिवचरित्रावर सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

शिव जन्मोत्सवानिमित्त ११ फेब्रुवारी बुधवार रोजी सकाळी ८ वाजता रामलीला मैदानावर क्रिकेट स्पर्धा घेण्यात येणार आहे., १० वाजता जिल्हा मध्यवर्ती बॅंकेच्या परिसरात शिवचरित्रावर आधारीत ऑनलाईन परीक्षा घेतली जाणार आहे. १२ फेब्रुवारी गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात व्हॉलीबॉल स्पर्धा, तसेच ११.३० वाजता शिवचरित्रावर ऐतिहासीक छायाचित्रावरविद्यार्थ्यांना माहितीचे सादरीकरण केले जाणार आहे.

१३ फेब्रुवारी शुक्रवार रोजी सायंकाळी ६.३० वाजता स्व. ॲड. पंडितराव देशमुख क्रिडा संकुलन अकोला रोड येथे लॉन टेनिस स्पर्धा , १४ फेब्रुवारी शनिवार रोजी सकाळी ५.३० ते ७ छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात योगा, थॉयरॉईड, डायबीटीज रोगावर मार्गदर्शन शिबीर घेण्यात येणार आहे. १५ फेब्रुवारी रविवार रोजी सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात महिला व मुलांसाठी भव्य मॅराथॉन स्पर्धा घेण्यात येणार आहे. सायंकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती परिसरात कवि संमेलन होणार आहे. १६ फेब्रुवारी सोमवार रोजी सकाळी ८.३० वाजता स्टडी सर्कल पॉईट गुरुकुल येथे शिवचरित्रावर सामान्य ज्ञान स्पर्धा घेतली जाणार आहे. दुपारी १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात रयतेचे प्रदर्शन (आनंद न गरी) होणार आहे. सायंकाळी ४ वालता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात होम मिनिस्टर स्पर्धा घेतली जाणार आहे. १७ फेब्रुवारी मंगळवार रोजी सकाळी ९.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात बालगट व खुल्या गटात वेशभुषा, अभिनय, नृत्य स्पर्धा घेतली जाणार आहे. १८ फेब्रुवारी बुधवार रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात वक्तृत्व स्पर्धा घेतली जाणार आहे. सायंकाळी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात महिलांसाठी रांगोळी स्पर्धा घेतली जाणार आहे. सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात दिपोत्सवाचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात सांस्कृतीक तीन दिवशीय स्पर्धाचार समारोप विजेत्यांचे सादरीकरण होणार आहे. १९ फेब्रुवारी गुरुवार रोजी सकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात शिव अभिषेक होणार आहे. सकाळी ७ वाजता त्याच ठिकाणी ध्वजारोहण, ८ वाजता शिव पाळणा, शिवपुजन व शिव गजर होणार आहे. १० वाजता रक्तदान शिबीर घेण्यात येणार आहे. त्यानंतर भव्य मिरवणुक व शोभायात्रा, शिवज्योत मवाळ्यासह घोडदळ, वारकरी मंडळी, रथ, वारकरी महिला, शिवशंभो ढोल पथक, तलवारबाजी, पारंपारीक बंजारा नृत्य, आदिवासी नृत्य, चलचित्र पथक देखावा, युवकाचे बॅंड पथक सहभागी असणार आहेत. दुपारी ३ वाजता शिव छत्रपती गौरव पुरस्कार व बक्षिस वितरण होणार आहे. सायंकाळी ६ वाजता भव्य अतिषबाजी व दिपोत्सव होणार आहे. सायंकाळी ७ वाजता शिव गीतांचा बहारदार कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सार्वजनिक शिव जयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# सिध्देश्वर जिल्हा परिषद गणात ॲड. शरद कोकाटे मैदानात उतरणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ फेब्रुवारी**



औंढा नागनाथ तालुक्यातील सिद्धेश्वर जिल्हा परिषद सर्कलमध्ये आगामी निवडणुकांचे बिगुल वाजण्यापूर्वीच राजकीय वातावरण तापू लागले आहे. या मतदारसंघातून मूर्तीजापूर सावंगी (पातळवाडी) येथील उच्चविद्याविभूषित युवा वकील ॲड. शरद दत्तात्रय कोकाटे यांनी शिवसेना (शिंदे गट) कडून आपली प्रबळ दावेदारी सादर केली आहे. एका अभ्यासू आणि तरुण वकीलाने जनसेवेसाठी राजकीय आखाड्यात शड्डू ठोकल्याने प्रस्थापित राजकारण्यांच्या गोटात चांगलीच खळबळ माजली आहे.

ॲड. शरद कोकाटे हे सध्या हिंगोली न्यायालयात वकिली व्यवसायात कार्यरत आहेत. कायद्याचे सखोल ज्ञान आणि प्रशासकीय कामाचा अनुभव असल्याने ग्रामीण भागातील प्रश्न तांत्रिकदृष्ट्या सोडवण्यात ते सक्षम मानले जात आहेत. केवळ आश्वासनं न देता, योजनांची अंमलबजावणी कायदेशीर चौकटीतून कशी करून घेता येईल, याचा ठोस आराखडा त्यांनी तयार केला आहे.

हिंगोलीचे नगर पालिकेचे शिवसेनेचे गटनेते श्रीराम बांगर यांचे कट्टर समर्थक म्हणून ॲड. कोकाटे यांची ओळख आहे. बांगर यांच्या नेतृत्वाखालील कार्यपद्धती आणि शिवसेनेची (शिंदे गट) विकासाभिमुख विचारसरणी तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कोकाटे गेल्या अनेक दिवसांपासून मतदारसंघात सक्रिय आहेत.

सिद्धेश्वर सर्कल अंतर्गत येणाऱ्या सिद्धेश्वर, ढेगज, वडचुना, दुरचुना, सुकापूर, ब्राह्मणवाडा, मूर्तीजापूर सावंगी, गांगलवाडी, भोसी, नागझरी, नंदगाव (तांडा), सावळी बुद्रुक, दुधाळा या गावांमध्ये कोकाटे यांना युवकांचा प्रचंड पाठिंबा मिळत आहे.

ॲड कोकाटे यांनी पीक विमा आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, ग्रामीण तरुणांना स्थानिक पातळीवर संधी उपलब्ध करणे, महिलांना तांत्रिक आणि कायदेशीर बळ देणे या मुद्द्यांवर त्यांनी लक्षकेंद्रीत करीत काम केले आहे.

त्यामुळे शिवसेना (शिंदे गट) सध्या राज्यात 'बल्क' निकालावर भर देत आहे. अशा वेळी स्वच्छ प्रतिमा, उच्च शिक्षण आणि दांडगा जनसंपर्क असलेला चेहरा म्हणून ॲड. शरद कोकाटे यांचे नाव आघाडीवर आहे. सामान्य माणसाला कोर्ट–कचेरी आणि सरकारी कार्यालयात न्याय मिळवून देण्यासाठी मी सदैव तत्पर आहेच, पण आता धोरणात्मक बदल करण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची इच्छा आहे, अशी भावना ॲड. कोकाटे यांनी व्यक्त केली आहे.

# सल्लागारपदी निवड झाल्याबद्दल नंदकिशोर तोष्णीवालांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ फेब्रुवारी**

दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागाच्या उपभोक्ता सल्लागार समितीवर ज्येष्ठ पत्रकार तथा व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल यांची खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्या शिफारशीतून नियुक्ती करण्यात आली आहे.

दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागाच्या रेल्वे उपभोक्ता सल्लागार समितीवर हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकरांचे प्रतिनिधी म्हणून नंदकिशोर तोष्णीवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

रेल्वे संघर्ष समितीच्या माध्यमातून सुद्धा त्यांनी रेल्वेच्या विविध प्रश्नावर सातत्याने मागण्या लावून धरल्या आहेत. या नियुक्ती बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. गजाननराव घुगे, दिलीप चव्हाण, गजेंद्र बियाणी, पंकज अग्रवाल, अनिल नैनवाणी, सुमित चौधरी, सुधीर गोगटे, प्रकाश इंगोले, खलील बेलदार, यांच्यासह सर्व पत्रकार मंडळी, आदींची उपस्थिती होती.

# जिथे जिथे मानव आहे ; तिथे तिथे परमेश्वराचा अंश : जगद्गुरु भीमाशंकर शिवाचार्य महाराज

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ४ फेब्रूवारी-**

श्री गुरू दशमुख आश्रम, भिमाशंकरनगर गोपाळचावडी येथे दि.५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विश्वशांती महायज्ञ आणि श्री केदारनाथ रावळ जगद्गुरू पट्टाभिषेक रजत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या नमित्ताने दिनांक ४ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत संबोधित करताना सदरील धार्मिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने परमेश्वराचे महती सांगत असताना परमेश्वर हे मानव जिथे जिथे आहे तिथ परमेश्वर आहे असे मत जगद्गुरु श्री भीमाशंकर शिवाचार्य महाराज यांनी मांडले.

गोपाळ चावडी येथील श्री गुरू दशमुख आश्रम, भिमाशंकरनगर गोपाळचावडी येथे ५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत गोपाळचावडी येथे १०८ महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही उपस्थिती राहणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री. केदार जगद्गुरु यांचे आशिर्वाद घेवून सांगितले. एवढेच नसून या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना घेवून येणार असल्याचेही



अभिवचन जगद्गुरु यांना त्यावेळी दिले. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण असून कार्यक्रमाचे संयोजक माजी आमदार ओमप्रकाश

ओमप्रकाश पोकर्ण असल्याचे माहिती महाराज यांनी पत्रकार परिषदेत दिली यावेळी पुढे बोलताना जगद्गुरु श्री भीमाशंकर शिवाचार्य महाराज यांनी धर्म की जय हो सनातन धर्म की रक्षा हो, परंपरा की रक्षा हो असा संदेश या कार्यक्रमातून समाज बांधवांना देण्यासाठी व १००८ ही पदवी मिळून २५- वर्ष पूर्ण झाले असल्याने रजत महोत्सव

या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचेही सांगितले यावेळी धर्माची महती महंतांची महती समाज बांधवापर्यंत पोहोचवण्यासाठी व जे गोरगरीब समाज बांधव केदारनाथ येथे जाऊ शकत नाही त्यांच्यासाठी केदारनाथ मंदिराची प्रतिकृती बनवून त्यांचे दर्शन घडवून देण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन दिनांक ५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी पर्यंत काहीच केलेले आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आले आहे या पत्रकार परिषदेला दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्ण, ईश्वरराव भोसीकर, किशोर स्वामी, बालाजी पांडागळे, एकनाथ मामडे, गंगाप्रसाद काकडे, राजू काळे, विनोद कांचनगिरी त्यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती.

# शेंबोलीच्या गायरान जागेवर रस्त्याचे अतिक्रमण

**तभा वृतसेवा**
**मुदखेड ,दि. ४ फेब्रूवारी-**

मुदखेड तालुक्यातील शेंबोली येथील गायरान जागेवर रस्ता तयार करून अतिक्रमण केल्याची तक्रार सरपंच नीता बाळासाहेब देशमुख यांनी जिल्हा अधिकाऱ्याकडे केली असून . ग्रामपंचायत ने ग्रामपंचायतीच्या रस्त्यावर अतिक्रमण केल्याची तक्रार लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली असून जिल्हाधिकारी यांनी गायरान जागेच्या मोजणीचे आदेश काढले असून . भूसंपादन विभागाने याची तातडीने मोजणी केली असून हद्द कायम होणार असल्याने प्रलंबित ३३ केव्ही उपकेंद्राचा प्रश्न मार्गी लागणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

या भागातील अनेक गावांना कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने विजेचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी या भागात ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्यात यावे अशी मागणी गेल्या सात वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करून शेंबोली ग्रामपंचायत च्या वतीने करण्यात आली होती . या मागणीनंतर महावितरण कंपनीने ३३ केवी विद्युत उपकेंद्र मंजूर केले होते . शेंबोली ग्रामपंचायत अंतर्गत ३३ केव्ही उपकेंद्रासाठी गावठाण नोंद



गट क्रमांक १२७ मधील ६० आर जागा भूसंपादित करण्यात आली होती . भूसंपादन केलेल्या जागेवर अतिक्रमण करून रस्ता तयार करण्यात आले असल्याने ३३ केव्ही उपकेंद्राचे काम रखडले आहे . यामुळे गेल्या अनेक वर्षापासून वीज पुरवठा सुरळीत मेळावा यासाठी प्रयत्नशील असलेल्या अनेक गावातील ग्रामस्थांना अजूनही प्रतीक्षाच करावी लागत असल्याने रस्ता अतिक्रमणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे .

बारड गावठाण गट क्रमांक १६५, शेंबोली गावठाण गट क्रमांक १२७, एकमेकाच्या जवळ आहे . संपूर्ण गावठाणची जमीन डोंगराळ आहे . परंतु गेल्या अनेक वर्षापासून अवैद मार्गाने दोन खनिजची बोकरी करून डोंगर भोईसपाट करण्यात आला आहे . याशिवाय आजूबाजूच्या लगत तू शेजारी शेतकऱ्यांनी गावठाणची जमीनीवर कब्जा केला आहे . गावठाणच्या शासन जमिनीच्या संरक्षणाची जबाबदारी नेमकी कोणाची? असा प्रश्न निर्माण झाला आहे . रस्त्याच्या अतिक्रमणासाठी शेंबोली ग्रामपंचायत ने गावठाण जागेवर अतिक्रमण करून रस्ता केल्याप्रकरणी जिल्हा अधिकाऱ्यांकडे सरपंच नेता बाळासाहेब देशमुख यांनी लेखी तक्रार केली आहे . याबाबत सातत्याने पाठपुरावा करून अनेक वेळा लेखी निवेदन देऊन गावठाण जागेची मोजणी करून हद्द कायम करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती . जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत आदेश जारी केले असून पुन्हा एकदा भूसंपादन विभागाने जागेची मोजणी केली असून रस्त्याचे अतिक्रमण हटवून ३३ केव्ही उपकेंद्राचा प्रश्न मार्गी लागणार का याची आस ग्रामस्थांना आहे .

**महावितरण ३३ केव्ही उपकेंद्राचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार**

शेंबोली गावठाण जागेत ३३ केव्ही उपकेंद्र मंजूर करण्यात आले असून . भूसंपादन केलेल्या जागेतून ग्रामपंचायतची परवानगी नसताना रस्ता काढून शेंबोली बारड शिवरस्ता असल्याचे सांगत वॉटर ग्रीड जलकुंबासाठी तसेच पावर प्रोजेक्ट जाण्या येण्यासाठी रस्ता तयार करण्यात आला असल्याची लेखी तक्रार सरपंच नीता बाळासाहेब देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे केली आहे . भूसंपादन करण्यात आलेली जागा बदलण्याचा अधिकार नसताना शासकीय जागेवर अतिक्रमण करण्यात आले असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे . या जागेची भूसंपादनने मोजणी केली आहे. आता हद्द कायम होणार असल्याने महावितरण ३३ केव्ही उपकेंद्राचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे .

# तोल जाऊन पडल्याने धबधब्यात बुडून किनवट येथील युवकाचा दूर्दैवी मृत्यू

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ४ फेब्रूवारी-**

माहूर तालुक्यातील शेख फरीद वझरा येथील दर्गाहचे दर्शन करून सुप्रसिद्ध धबधब्याचे फोटो काढत असताना तोल जाऊन धबधब्याच्या खालील डोहात पडल्याने किनवट येथील एका ३२ वर्षीय तरुणाचा डोहातील खोल पाण्यात बुडाल्याने मृत्यू झाल्याची अत्यंत हृदयद्रावक घटना दि.०३ फेब्रुवारी रोजी दुपारी १ ते २ वाजेच्या दरम्यान घडली. या दुःखद घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

किनवट तालुक्यातील गोकुंदा येथील राहिवासी असलेला शेख इर्शाद शेख रफिक वय ३२ हा युवक मित्रांसोबत शेख फरीद बाबा वझरा येथील दर्गाह येथे दर्शनासाठी गेला होता. त्या ठिकाणी असलेल्या धबधब्यावर फोटो काढत असताना त्याचा तोल जाऊन तो धबधब्याच्या खालील डोहाततील पाण्यात पडला. पाण्याचा अंदाज न लागल्यामुळे तो बुडाला. आजूबाजूच्या लोकांनी व मित्रांनी त्याला पाण्याबाहेर काढले परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. शेख फरीद बाबा दर्गाह येथे दर्शन आणि पर्यटनासाठी लाखोच्या संख्येने भाविक पर्यटक येतात. अनेकवेळा दुर्घटना घडून भाविकांचा येथे बुडून मृत्यू झालेला आहे. भाविक आणि पर्यटकांच्या सुरक्षेसाठी उचित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## हाणेगावात चोरट्यांचा खेळ खल्लास !

**हाणेगाव -** देगलूर तालुक्यातील हाणेगाव परिसरात मागील काही दिवसांपासून चोरीच्या घटनांनी डोके वर काढले होते. यामुळे व्यापारी वर्गासह नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. वारंवार घडणाऱ्या चोऱ्यांमुळे चोर सापडणार तरी कधी? असा प्रश्न उपस्थित होत असतानाच मरखेल पोलिस ठाण्याने या गुन्हेगारी प्रवृत्तीविरोधात कंबर कसून . शेवटी चोरट्यांना पकडले. या कारवाईमुळे बालाजी पाटील इंगळे यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. मरखेल पोलिस ठाण्यामार्फत सातत्याने शोध मोहीम राबविण्यात येत होती. मात्र अपेक्षित यश मिळत नसल्याची खंत पोलिस कर्मचाऱ्यांना सतावत होती. अखेर ३० जानेवारीच्या मध्यरात्री गस्ती दरम्यान मरखेल पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विलास धोंडिराम पवार, पोलिस कॉन्स्टेबल सय्यद व पोलिस कॉन्स्टेबल चालक सोनकांबळे यांच्या सतर्कतेने आणि दबंग कारवाईने चोरट्यांना रंगेहात पकडण्यात यश मिळाले. या धाडसी आणि कार्यतत्पर कारवाईमुळे हाणेगाव परिसरातील व्यापारी व नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला असून, मरखेल पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. पोलिसांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे देगलूर तालुकाध्यक्ष बालाजी पाटील इंगळे यांच्या वतीने पोलिस उपनिरीक्षक विलास पवार व त्यांच्या संपूर्ण टीमचा सत्कार करण्यात आला. कार्यतत्परता, धैर्य आणि कर्तव्यनिष्ठेचा आदर्श घालून देणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान होणे म्हणजे समाजात पोलिस दलाविषयी विश्वास अधिक दृढ होण्यासारखेच आहे. मरखेल पोलिसांच्या या कामगिरीमुळे गुन्हेगारांना स्पष्ट इशारा मिळाला असून, कायदा-सुव्यवस्थेवर जनतेचा विश्वास अधिक बळकट झाला आहे.



## रमझान सणाच्या पार्श्वभूमीवर नगर परिषदेकडे सविस्तर मागण्यांचे निवेदन

**किनवट -** येणाऱ्या पवित्र रमझान महिन्याच्या पार्श्वभूमीवर किनवट नगर परिषदेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते अभय नगराळे यांनी नगर परिषद प्रशासनास प्रभाग क्रमांक ४ सह शहरातील मुस्लिम बहुल भागांमध्ये आवश्यक नागरी सुविधा व उपाययोजना तातडीने राबविण्याबाबत सविस्तर निवेदन सादर केले आहे. रमझान महिन्यात मुस्लिम समाजात रोजा, नमाज, तरावीह व इफ्तार यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांसाठी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, दिवाबत्ती व आरोग्य विषयक सुविधा सुचारू राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनात प्रामुख्याने प्रभाग क्रमांक ४ तसेच शहरातील सर्व मुस्लिम बहुल परिसरात दररोज नियमित स्वच्छता, कचरा उचल, नाल्यांची साफसफाई व औषध फवारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच रमझान कालावधीत पाणीपुरवठा नियमित व पुरेशा दाबाने करण्यात यावा, पाणीटंचाई भासणाऱ्या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच शहरातील बंद व खराब अवस्थेतील पथदिवे तात्काळ दुरुस्त करून सर्व स्ट्रीट लाईट सुरू ठेवावेत, मशिदी व इफ्तार स्थळांच्या परिसरात अतिरिक्त प्रकाश व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. अंतर्गत रस्ते, गल्लीबोळ व मशिदीकडे जाणारे मार्ग स्वच्छ व सुस्थितीत ठेवण्याबाबतही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. नगर परिषद क वर्ग अंतर्गत उपलब्ध असलेल्या सर्व यंत्रणा, मनुष्यबळ व संसाधनांचा वापर करून रमझान काळात नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, तसेच शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशी अपेक्षा गटनेते अभय नगराळे यांनी व्यक्त केली आहे. नगर परिषद प्रशासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेऊन रमझान सणाच्या पार्श्वभूमीवर योग्य व नियोजनबद्ध उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## हरभरा पिकावर करपा रोग...

**आदमपूर -** आदमपूर, गळेगांव,थडीसावळी, ता.बिलोली परिसरात बहरात आलेल्या हरभरा पिकांवर रोग करपा पसरल्याचे सद्यस्थितीत चित्र आहे.काही प्रमाणात दमट वातावरण व धुके निर्माण झाल्याने, त्याचाही परिणाम हरभरा पिकावर सर्वत्र दिसून येत आहे. शेतकऱ्यांकडून आता हरभरा पिकावर अंतिम फवारणी शेतकरी करताना दिसून येत आहेत. पहिला, दुसरा,तीसरा फुलांचा बहार हरभऱ्यास बसलेला आहे. घाटी हरभऱ्यास लगडल्याने शेतकरी आनंदात असताना ही समस्या आ वासून शेतकऱ्यांसमोर उभी राहिली आहे.परंतु ऐन बहरात असताना धुके किंवा अंतर्गत बुरशीजन्य रोगाने हरभरा करपून जात असल्याने, शेतकरीवर्गांत काहीशी निराशा पसरलेली दिसून आली.

# इंदिरा आवास नगरमध्ये अवैध शिंदी-दारू विक्रीचा प्रश्न गंभीर

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ४ फेब्रूवारी-**

देगलूर तालुक्यातील खानापूर येथील इंदिरा आवास नगर परिसरात बेकायदेशीर व बिनापरवानगी शिंदी व दारूची विक्री सुरू असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. रसायनमिश्रित शिंदीची विक्री जोमात सुरू असून, त्यामुळे येथील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

परवानगीशिवाय सुरू असलेल्या दारूच्या विक्रीमुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत असून अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर येत आहेत. नशेच्या अवस्थेत भान सुटल्याने कौटुंबिक हिंसाचार, वाद-विवाद तसेच सामाजिक तणावाच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे नागरिकांनी नमूद केले आहे. यामुळे परिसरातील सामाजिक सलोखा बिघडत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न



निर्माण होत आहे.

या गंभीर बाबींकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नागेश यलपा पलपवार व समस्त इंदिरा आवास नगर येथील नागरिकांनी राज्य उत्पादन शुल्क विभाग देगलूर व उपजिल्हाधिकारी देगलूर यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनावर परिसरातील नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाची तात्काळ चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अन्यथा नागरिकांच्या वतीने आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप करून परिसरात शांतता व सुरक्षितता राखावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# शेतकरी भवनासाठी दिड कोटीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता : आ. केराम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ४ फेब्रूवारी-**

कृषी उत्पन्न बाजार समितीत सुमारे १ कोटी ५२ लाख ७१ हजार २४७ रुपयांच्या नवीन शेतकरी भवन उभारणीसाठी राज्याच्या सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाने प्रशासकीय मान्यता दिली असल्याची माहिती आ.भीमराव केराम यांनी दिली.



यासंदर्भात अधिक माहिती देताना आ. केराम म्हणाले की,राज्य सरकारने संत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेतंर्गत राज्यतील कृषी उत्पन्न बाजार समितींना शेतकरी भवन बांधकामासाठी निधी देण्याचा निर्णय घेतला आहे.राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीत असलेल्या ठिकाणी शेतकरी बांधवांना मुक्कामाची सोय व्हावी,सोबतच मूलभूत सुविधा त्याच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात,यादृष्टीने हा निर्णय अंमलात येत आहे. योजनेतंर्गत ज्या बाजार समितीत आधीपासूनच शेतकरी भवन नाही,त्या बाजार समित्यांसह शेतकरी भवन अस्तित्वात आहे,परंतु सुस्थितीत नाही,अशा बाजार समितींना दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीने सन २०२२ - २३ च्या दरसूचीवर आधारित नवीन शेतकरी भवनासाठी सल्लागार अभियंत्यामार्फत १ कोटी ५२ लाख ७१ हजार २४७ रुपयांचे अंदाजपत्रक सहकार, पणन विभागाकडे दाखल केले होते. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळावी,यासाठी आ.भीमराव केराम यांनी सहकार मंत्री व संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला.त्यानंतर राज्याच्या सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अवर सचिव माधवी सं. शिंदे यांनी दि.२ फेब्रु.रोजी 'क' वर्गात येणाऱ्या किनवट बाजार समितीच्या शेतकरी भवनासाठीच्या अंदाजपत्रकास मान्यता दिल्याचे पत्र निर्गमित केले आहे.सहकार विभाग वरील अंदाजपत्रकापैकी दोन टप्प्यात ७० टक्के निधी देणार असून,उर्वरित खर्च हा स्वनिधी अथवा कर्जातून करावयाचा असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# अधिकाऱ्यांतील समन्वय अभावामुळे मूरुमाचे अवैध उत्खनन जोमात

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ४ फेब्रूवारी-**

शासकीय आय.टी.आय.व ग्रामीण रुग्णालयाच्या पुर्वे बाजुला थोड्या अंतरावर गौण खनिज मूरुमाची वाहतूक रात्रभर बिनदिक्कत पणे चालु आहे.तहसिलदाराचे मंडळ अधिकारी व तलाठी यांच्यात समन्वय नसल्याने अवैध मूरुमाचे उत्खनन जोमात सुरू आहे.

याकडे कंधारचे उपविभागीय अधिकारी दुर्लक्ष करत असल्याने तालूका महसूल यंत्रनेत मरगळ आल्याचे दिसून येत आहे.महसुल विभागात कमालीची यंत्रणा आहे. अवैध उत्खनाची कल्पना असताना जाणुन बुजुन या बाबींकडे कानाडोळा केला जात आहे. अवैध मूरुम ,काळी माती व रेती वाहतूकीवर महसूल प्रशासनाकडून आळा घालण्यात यावा अशी मागणी होत आहे.

लोहा तालुक्यात मागील काही दिवसापासून काळी माती ,मूरुम गौनखनिजाची अवैधरित्या जोमात उत्खनन सूरु आहे. लोहा महसूल विभाग मात्र याकडे साफ दूर्लक्ष करित आहे. गौणखनिजाचे उत्खनन होवू नये अवैध रेतीची वाहतूक होवू नये या करिता महसूल विभागाकडून

पथके नेमण्यात आल्याची माहिती आहे पण सदरील पथक कागदावर नावालाच आहे काय ?अशा प्रशन उपस्थित होत आहे.



नांदेडचे जिल्हाधिकारी अवैध रेती उपसा करणाऱ्या यंत्रनेवर धाड टाकुन ९ जिसीपी,१० हायवा जप्त करुन लोहा तहसील कार्यालय जमा केले जिल्हाधिकारी यांनी तालुक्यातील अवैध धंदे चालु आहेत हे कळते तालुका महसूल यंत्रणेना काळ कळत नाही.हे गुपित गोंडबंगाल आहे.

तालुका महसूल पथक कार्यरत असताना मूरुम व रेतीची वाहतूक होत असताना पथक कोणाचा शोध घेत आसते. हा प्रश्न निर्माण होत आहे. अवैध गौनखनिजाची वाहतूक करणारी मंडळी हि महसूल कर्मचाऱ्यांशी हातमिळवणी करुन आपला व्यवसाय सूरु केल्याची खात्रीलायक माहिती मिळत आहे. महसूलशी अर्थिक हितसंबध असल्यानेच हा प्रकार सर्रास सूरु असल्याचे उघडपणे बोलले जाते.यामूळे शासनाचा लाखोंचा महसूल बूडत आहे. तहसीलदार व महसूलच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी होत असलेल्या गौनखनिजच्या उत्खननाकडे कानाडोळा करत असल्याने काळी माती,मूरुम व रेती माफीयांचे मनोबल वाढले आहे. हायवा, ट्रॅक्टर या वाहनाद्वारे रात्रीला मूरुम व रेतीची सर्रास वाहतूक होत असल्याचे दिसून येत आहे.लोहा महसूल अधिकारी या कडे जाणून बूजून दूर्लक्ष करित असल्याचे निदर्शनास येते. पारंपरिक जातीचा व्यवसाय करणारे अनेक कुटुंब आहेत पण काही ठेकेदाराचा विट्ट भट्टीचा व्यवसाय नसताना महसूलच्या अधिकाऱ्याला हाताशी धरुन ५० ब्रास काळ्या मातीची रायलटी असताना त्या गटात १००० ब्रासचे उत्खनन केले जाते या प्रकाराला कोणाचा आशिर्वाद आहे. तालुक्यात सूरु असलेल्या काळी माती,अवैध मूरुम व रेती वाहतूकीकडे लक्ष घालून होत असलेल्या वाहतूकीवर आळा घालावा व अवैध मूरुम रेती वाहतूक करित असलेल्या वाहनावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

# एकल प्लास्टिकच्या विरोधात नगर पालिकेची कारवाई

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ४ फेब्रूवारी-**

केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या पर्यावरण विभागाच्या आदेशान्वये पर्यावरणास घातक असलेल्या एकल प्लास्टिकचा होत असलेल्या भरमसाठ वापराबद्दल याच्यावर कुठेतरी अंकुश लावण्याकरिता धडक मोहीम राबविण्याचे आदेश श्रीमती दोनुरू अनन्या रेड्डी भा.प्र.से मुख्याधिकारी तथा परिविक्षाधीन सहाय्यक जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडून प्राप्त होताच दि.३ फेब्रुवारी २०२६ रोजी शहरातून ४० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आली असून यावेळी एकूण १८ हजार रुपये दंडात्मक वसुली देखील करण्यात आली. यावेळी पथक प्रमुख प्रशांत डोईजड यांच्यासह शहर समन्वयक प्रणाली मुजमुले,



मल्हारी गायकवाड, रवी राठोड, दिगंबर काळे,सिद्धार्थ पंडित, शेख मोहम्मद यांनी या मोहिमेअंतर्गत परिश्रम घेतले.

सामान्य जनता दैनंदिन जीवनात गरजेपेक्षा जास्त प्लास्टिक वापरते चांगले पर्याय उपलब्ध असतानाही आपण सवयीमुळे प्लास्टिक एकल पिशव्या वापरत असतो या प्लास्टिक पिशव्या वायू प्रदूषण वाढविण्याचे प्रमुख कारण आहे. या पिशव्या नदी, नाले आणि समुद्रात पोहोचतात आणि त्यात राहणाऱ्या प्राण्यांचे तसेच कचऱ्याच्या ढिगारावर असणाऱ्या पिशव्यांमुळे अनेक प्राण्यांचे मृत्यूचे कारण ही बनतात त्यामुळे केंद्र व राज्य शासनामार्फत धडक कारवाई वेळोवेळी राबविण्यात येत असते.

**मुदखेड नगरपरिषद मुदखेड**
ता. मुदखेड जि. नांदेड
ई-निविदा सूचना सन 2025-26

मुदखेड नगरपरिषद मुदखेड जि.नांदेड यांचेकडून मुदखेड नगरपरिषद हद्दीतील भटक्या कुत्र्यांची संख्या मर्यादित ठेवणे, रेबीज निर्मुलन करणे, मनुष्य कुत्रा संघर्ष टाळणे ई. बाबींच्या अनुषंगाने भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करून संख्या नियंत्रित करणे. या कामा संबधी ई-निविदा दि.05/02/2026 ते दि.12/02/2026 पर्यंत मागविण्यात येत आहे. सदरील कामासंबधीचा सविस्तर तपशील https:/mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगरपरिषद मुदखेड

## संक्षिप्त वृत्त...

### एल्गार सभेत धनगर बांधवांनी उपस्थित रहावे- मंगेश घोरपडे



**पालम,/प्रतिनिधी-** धनगर जमातीच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाबाबत पुढील दिशा ठरवण्यासाठी दि. ११ रोजी अहिल्या नगर जिल्ह्यातील शिर्डी येथील भव्य एल्गार सेवेचे आयोजन करण्यात येणार आहे या होणाऱ्या सभेला पालम तालुक्यातील धनगर समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सकल धनगर संघटनेचे पालम तालुका मुख्य प्रवर्तक मंगेश घोरपडे यांनी एका प्रसिद्धी पत्राद्वारे करण्यात आले आहे. देण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रामध्ये महाराष्ट्रात राज्यातील धनगर समाजाला भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानामध्ये पुष्ट क्र. ३६ वर हा समाज अनुसूचित जातीमध्ये समावेश केलेला असतानाही तत्कालीन राज्यकर्त्यांनी धनगर समाजाला एसटी आरक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप केले असल्याचे आरोप करण्यात आला आहे, सध्या सुरू असलेली लढाई निर्णय टप्प्यावर आली आहे याच लढाईची दिशा ठरवण्यासाठी संघर्ष योद्धा दीपक बोराडे यांच्या नेतृत्वाखाली समाजाला स्वाभिमानी आणि ठाम विचार मिळत आहे यामुळे धनगर समाजाने एकसंघ होऊन पुढील वाटचाल ठरण्याची गरज आहे हीच गरज लक्षात घेता पालम तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी शिर्डी येथे होणाऱ्या महा एल्गार सभेला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असेही आव्हान मंगेश घोरपडे यांनी केले आहे

### मतदान करणे राष्ट्रीय कर्तव्य: डॉ. गव्हाणे



**पूर्णा,/प्रतिनिधी-** येथील श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग व गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ०३ फेब्रुवारी रोजी ''मतदान देशासाठी लोकशाहीला प्रबळ करण्यासाठी'' या विषयावर राष्ट्रीय ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. यशवंत महाविद्यालय नांदेड येथील प्राध्यापक व प्रसिद्ध विचारवंत डॉ. अजय गव्हाणे उपस्थित होते.ते म्हणाले की लोकशाही टिकून ठेवण्यासाठी मतदान करणे किती आवश्यक आहे यासाठी मतदारराजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो जेणेकरून भारतीय लोकशाही आणखी प्रबळ होण्यास मदत होईल.समता प्रस्थापित करण्यासाठी मतदान करणे गरजेचे आहे, मतदान हे अत्यावश्यक आहे, राजकीय व्यवस्था टिकविण्यासाठी मतदान हे केवळ जातपात, धर्म, वंश हे पाहून न करता प्रामाणिक व चारित्र्यसंपन्नतेला महत्व देऊन मतदान करावे. श्री गुरु बुद्धीस्वामी शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव अमृतराज कदम यांनी उद्घाटन केले. यावेळी मार्गदर्शन करताना कदम म्हणाले की मतदारांमध्ये मतदानाविषयी असलेली मानसिकता व मतदानाची टक्केवारी वाढविणे ही सर्व भारतीय नागरिकांची जबाबदारी असून ते आपल्या सर्वांचे आद्यकर्तव्य आहे. प्राचार्य डॉ.के.राजकुमार यांनी अध्यक्षीय समारोप केला.

### ज्येष्ठ गायक डॉ.गुलाम रसूल स्मृतीप्रित्यर्थ संगीत महोत्सवाचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी-** येथील ज्येष्ठ गायक कलावंत डॉ. गुलाम रसूल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन दिवसीय संगीत महोत्सवाचे आयोजन ७ व ८ फेब्रुवारी रोजी पाथरी रोडवरील शुभमंगल कार्यालयात करण्यात आले आहे. ७ फेब्रुवारी रोजी महोत्सवाच्या उद्घाटनानंतर एश्वर्या डावरे यांच्या शास्त्रीय नृत्याचे सादरीकरण होणार असून, त्यानंतर सीमा दडके यांचे शास्त्रीय गायन सादर केले जाईल. पुणे येथील गायक विशाल मोघे यांची शिखर मैफल हा दिवसाचा मुख्य आकर्षण ठरणार आहे.

# बारावीची १० फेब्रुवारी तर दहावीची २० फेब्रुवारीपासून परिक्षा : वर्गखोल्यात राहणार सीसी टिव्ही कॅमेऱ्याची नजर

**परभणी,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत १० फेब्रुवारीपासून बारावी तर २० फेब्रुवारी पासून दहावीच्या परिक्षा घेतल्या जाणार आहेत. परभणी जिल्हयात या परिक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी शिक्षण विभागांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. विद्यार्थ्यांकडून परिक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. परीक्षा केंद्रात गैरप्रकार आढळल्यास तत्परतेने कायदेशीर कार्यवाई करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिली.

कॉपीमुक्त अभियानासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक मंगळवार ३ जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सविता बिरगे यांच्यासह पोलीस विभागाचे अधिकारी व सर्व गटशिक्षण अधिकारी उपस्थित होते.

परभणी जिल्हयात बारावीचे एकूण ६९ परिक्षा केंद्र असून २७ हजार २५० विद्यार्थी संख्या आहे. तर दहावीचे ९१ परिक्षा केंद्र असून विद्यार्थी संख्या २९ हजार ९११ आहे.

परिक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन जिल्हाधिकारी म्हणाले की, यंदा दहावी, बारावीची परिक्षा संपूर्णपणे कॉपीमुक्त होण्यासाठी राज्यशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. गैरप्रकार होऊ नये यासाठी जिल्हयातील सर्व परिक्षा केंद्रांतील वर्ग खोल्यांमध्ये सीसी टिव्ही कॅमेरे लावणे आवश्यक आहे. गटशिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित केंद्रप्रमुखांना सीसी टिव्ही कॅमेरे लावण्याबाबत लेखी पत्राव्दारे कळवावे. ज्या परिक्षा केंद्रांवर सीसी टिव्ही कॅमेरे लावले नसल्याचे आढळल्यास याची गांभीर्याने दखल घेऊनअशा ठिकाणी शिक्षकांची अदलाबदल करण्यात यावी. तसेच त्या केंद्राची मान्यता रद्द करण्यातबाबत, शासनाला कळविले जाईल.

परिक्षा काळात वीज लोडशेडींग असल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून बॅटरी किंवा इन्व्हर्टरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच संवेदनशील केंद्रांच्या परिसरात गैरप्रकार टाळण्यासाठी व्हिडीओ शुटींगची सुविधा ठेवावी. भरारी पथक व बैठे पथकांनी विशेष दक्षता घ्यावी. अनुचित प्रकार आढळल्यास तात्काळ कार्यवाई करावी.

अतिसंवेदन व संवेदनशील परिक्षा केंद्र परिसरात पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात यावा. वर्गखोल्यांमध्ये एका बाकावर एकच परिक्षार्थी असावा. महत्त्वाच्या पेपरच्या दिवशी मोठ्या प्रमाणात कॉपीचे प्रकार होणार नाहीत, याबाबत दक्षता घेण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

**परिक्षा केंद्र परिसरात कलम १४४...**

**परिक्षा केंद्रांच्या परिसरात फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात येणार आहेत. या कलमान्वये परिक्षा केंद्राजवळच्या १०० मीटर परिसरातील सर्व सार्वजनिक टेलीफोन/एसटीडी/भ्रमणध्वनी/आयएसडी/फॅक्स केंद्र, झेरॉक्स केंद्र व ध्वनीक्षेपके बंद राहतील. हा आदेश परिक्षार्थी, परिक्षेशी संबंधित अधिकारी, शिक्षक, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना लागू राहणार नाही. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कायदेशीर कार्यवाई केली जाईल.**

**कॉपी आढळल्यास होणार कायदेशीर कार्यवाही...**

**एखादा परिक्षार्थी विद्यार्थी कॉपी किंवा गैरवर्तन करताना आढळल्यास त्याच्या विरोधात पोलीसात गुन्हा दाखल होऊ शकतो किंवा विद्यार्थी ज्या विषयात कॉपी करताना पकडला त्या विषयाचा निकाल रद्द केला जाऊ शकतो. गरज भासल्यास संपूर्ण परिक्षेचा निकाल रद्द केला जाऊ शकतो.**

## बाबई येथे श्री संत गजानन महाराज मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा

**पाथरी,/प्रतिनिधी:-** परतुर तालुक्यातील बाबई येथे श्री संत गजानन महाराज प्रगटदिनचे औचित्य साधून नवीन झालेले मंदिर येथे मुर्ती प्राणप्रतिष्ठा व मंदिर कलशारोहन समारोहाचे आयोजन करण्यात आले असून या निमित्त १ ते ८ फेब्रुवारी दरम्यान संगित भागवत कथा साप्ताहाचे आयोजन करून विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वा श्री हभप गुरुवर्य भगवान बाबा आनंदगडकर यांच्या शुभहस्ते श्रीसंत गजानन महाराज मंदिर मुर्ती प्राणप्रतिष्ठा व मंदिर कलशारोहन सोहळा संपन्न होईल.या वेळी वेदमुर्ती ब्रम्हवृंद अग्निहोत्री श्री अतूल गुरूजी खांडविकर यांच्या हस्ते होम हवन, मंत्रोच्चार, पुजा विधी संपन्न होणार आहे.





या निमित्त १ फेब्रुवारी रोजी पासुन सकाळी ४ ते ६ काकडा भजन, ६ ते ८ गजानन विजय ग्रंथ पारायण, १० ते १२ गाथा भजन, दुपारी १ ते ४ भागवत कथा, ५ ते ७ हरीपाठ , ८ ते १० हरीकिर्तन यात रविवारी हभप रामकृष्ण मोगरे शास्त्री, सोमवारी श्री हभप प्रा उद्धव महाराज राऊत, मंगळवारी श्री हभप संतसेवक मधुकर म कांबळे, बुधवारी श्री हभप वेदांतचार्य पांडूरंग म वाघमारे, गुरुवारी श्री हभप भागवताचार्य माऊली म बाबईकर, शुक्रवारी श्री हभप भागवताचार्य राधेशाम म. शास्त्री, शनिवारी श्री राजेंद्र म. चोरडीया ८ फेब्रुवारी संत गजानन महाराज प्रगट दिन सकाळी श्रीं चा रुद्राभिषेक व नंतर १० ते १२ या कालावधीत श्री हभप महादेव महाराज गिरी शहागडकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या नंतर १२ ते ५ महाप्रसाद या नंतर महाप्रसादाने या साप्ताहाची सांगता होणार आहे. बाबई ग्रामस्थांचे सर्व जावाई, मुली व परिसरातील भाविक भक्तांनी या संपुर्ण कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संपुर्ण बाबई ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे

## ब्रह्मकुमारी मीरादीदी यांना आदर्श कर्तुत्ववान नारीरत्न पुरस्कार जाहीर

**गंगाखेड /प्रतिनिधी-** विद्यानिकेतन सामाजिक व शैक्षणिक संस्था,जिल्हा सातारा (वाई) यांच्या वतीने संस्थेच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक २२ फेब्रुवारी रविवार २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता भव्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यात समाजहितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या,आपल्या सेवाभावी कार्यातून स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या आदरणीय ब्रह्मकुमारी मीरादीदी (प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय,शाखा सोनपेठ यांच्या संचालिका) यांना आदर्श कर्तुत्ववान नारीरत्न २०२६ राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला असून. हा मानाचा पुरस्कार समाजसेवेत भरीव योगदान देणाऱ्या महिलांना प्रेरणा देण्यासाठी दिला जातो.मीरादीदी यांनी अध्यात्म,सामाजिक बांधिलकी,नैतिक मूल्यांची जपणूक तसेच महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली.या पुरस्कार सोहळ्यास अनिल सावंत (नगराध्यक्ष,वाई), संतोष शिंदे (उद्योजक व समाजसेवक), मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध सिने अभिनेता राजाराम शिंदे (मराठी फेम हुकुमाची राणी), तसेच सिने अभिनेत्री प्रियंका शिंदे (झी मराठी मालिका देव माणूस) यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत महाराष्ट्रातील विविध समाजोपयोगी कार्य करणाऱ्या अनेक गणमान्य व्यक्तींनाही यावेळी सन्मानित करण्यात येणार आहे.हा कार्यक्रम रमेश गरवारे सभाग्रह,लोकमान्य टिळक ग्रंथालय,वाई,जिल्हा सातारा येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न होणार आहे.

## श्री गुरु तेग बहादुर साहिबजी चे बलिदान हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे- प्रा डॉ. संजय गडपायले



**पालम,/प्रतिनिधी-** श्री गुरु तेग बहादुर यांनी आयुष्यभर मानवी मूल्यांची बीजे पेरली व त्यांचे रक्षण करून परधर्माच्या संरक्षणासाठी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. त्यांनी भारता समोरच नव्हे तर जगासमोर त्यागाचा आदर्श निर्माण केला. गुरुजींनी औरंगजेबाच्या मुच्छदीपणाचा स्पष्ट विरोध करून जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण केला म्हणून त्यांना हिंद की चादर असे म्हणतात. असे गौरवोद्गार प्रा. डॉ. संजय गडपायले यांनी दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी माधवराव पाटील महाविद्यालय पालम येथे श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले. यावेळी महाविद्यालयातील अनेक विद्यार्थिनींनी श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या जीवन कार्यावर आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपा मध्ये प्रा. डॉ. एस.बी. झांगडे सर म्हणाले की श्री गुरु तेग बहादुर साहिबांच्या कार्याचा व बलिदानाचा आदर्श सर्व जाती-धर्माच्या लोकांनी घ्यावा व अखंड भारत कसा राहील यासाठी प्रयत्न करावा. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉक्टर बी बी शिंदे यांनी तर आभार प्रा. डॉ.एन.बी.पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी प्राध्यापक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## जि.प.पं.स.निवडणूक नियुक्त कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण संपन्न



**पाथरी,/प्रतिनिधी:-** परभणी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ साठी नियुक्त केलेल्या केंद्राध्यक्ष,मतदान अधिकारी यांचे द्वितीय प्रशिक्षण आय टी आय कॉलेज विटा रोड पाथरी येथे शनिवार दिनांक ४ फेब्रुवारी २६ रोजी सकाळी ११ वाजता निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पाथरी श्रीमती संगीता चव्हाण व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार पाथरी श्री शंकर एन हांदेशवार यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती संगीता चव्हाण यांनी पिपिटी द्वारे सर्व अधिकारी, कर्मचारी यांना सविस्तर माहिती दिली. व आवश्यक त्या सूचना दिल्या.प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येणाऱ्या अडचणींबाबत माहिती देऊन त्या बाबत घ्यावयाच्या खबरदारीच्या सूचना केल्या.तसेच मास्टर ट्रेनर श्री अजय भुसारे,गजानन कुलकर्णी,श्री सचिन शिंदे यांनी ईव्हीएम डेमो द्वारे सर्वांना प्रशिक्षण दिले व ईव्हीएम हाताळणी सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून करून घेतली.काही कर्मचारी यांनी शंका विचारून त्याचे मास्टर ट्रेनर कडून निरसन करून घेतले.टपाली मतदान करण्यासाठी विशेष कक्ष प्रशिक्षण स्थळी उभारले होते त्यात मतदार असलेल्या नियुक्त कर्मचारी यांनी मतदान केले.आणखी दोन दिवस आय टी आय कॉलेज येथे टपाली मतदान करता येणार आहे.प्रशिक्षणास गट विकास अधिकारी श्री शैलेश वाव्हळे,गट शिक्षण अधिकारी श्री मुकेश राठोड,नायब तहसीलदार श्री वसंत महाजन,नायब तहसीलदार श्री रमेश धोपे,नायब तहसीलदार श्री हेमंत सुजलेगावकर,सहाय्यक महसूल अधिकारी श्री रघुनाथ केसकर, मिडिया नोडल अधिकारी श्री संदीपान घुंबरे,श्री जामकर,श्री आर ए मनेरे,श्री नरहरी पांचाळ,आकाश क्षीरसागर सर्व निवडणूक नियुक्त क्षेत्रीयअधिकारी, कर्मचारी इत्यादी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## संस्कार मूल्य अत्यंत महत्त्वाचे त्यातूनच समाज व परिवाराचा सर्वांगीण विकास होतो- ह.भ.प.नाव्हेकर महाराज

**गंगाखेड,/प्रतिनिधी:** आजच्या बदलत्या काळात संस्कारांची नितांत गरज असून, संस्कारांमुळेच सुसंस्कृत समाज आणि सुदृढ परिवार घडतो. माता-पित्यांनी गर्भावस्थेपासूनच आपल्या पाल्यावर चांगले संस्कार रुजवावेत.त्यासाठी धार्मिक ग्रंथांचे वाचन करावे,तसेच दूरदर्शनवर महाभारत,रामायण, भक्त प्रल्हाद यांसारख्या धार्मिक व संस्कारक्षम मालिका पाहाव्यात. अपसंस्कृती वाढवणाऱ्या मालिकांकडे दुर्लक्ष करावे.बालक पाचव्या वर्षी पोहोचल्यावर तुळशीमाळ घालून त्याच्यावर संस्कारांची मुहूर्तमेढ रोवावी,असे प्रतिपादन ह.भ.प. माणिक शास्त्री महाराज नाव्हेकर यांनी केले.ते संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कीर्तन सोहळ्यात बोलत होते.

कीर्तन सोहळा (दिनांक ४ फेब्रुवारी बुधवार) रोजी गंगाखेड येथील संत नरहरी महाराज सोनार मंदिरात भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

यावेळी महाराजांनी संत शिरोमणी नरहरी महाराज हे महादेवाचे अवतार पुरुष असून त्यांच्या विचारांचे व आचरणाचे अनुकरण प्रत्येकाने आपल्या जीवनात करावे,असे सांगितले. संत नरहरी महाराजांचे जीवन म्हणजे श्रद्धा,भक्ती,सत्य आणि नीतिमूल्यांचा आदर्श असल्याचे त्यांनी नमूद केले.पुढे बोलताना महाराज म्हणाले की,मानवाने सात प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे. विशेषतः जुगार, दारू पिणे, चोरी करणे, वेश्या गमन यांसारख्या दुर्गुणांपासून स्वतःला दूर ठेवून संतविचारांप्रमाणे आचरण केल्यासच जीवन सार्थक होते. कीर्तनातून त्यांनी समाजप्रबोधन



करत उपस्थित भाविकांना सदाचाराचा मार्ग दाखवला. या कार्यक्रमात गेल्या एक वर्षभर निस्वार्थ भावनेने भजनसेवा करणाऱ्या संत जनाबाई महिला भजनी मंडळाच्या सर्व महिलांचा सन्मान करण्यात आला. निर्मलाबाई तुकाराम डहाळे व गिरीश तुकाराम डहाळे यांच्या वतीने या महिलांना साडी-चोळी देऊन गौरविण्यात आले.किर्तन सोहळ्याच्या शेवटी उपस्थित भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून महाप्रसादाचा लाभ घेतला.संपूर्ण कार्यक्रम यशस्वीतेसाठी गिरीश डहाळे बवणकर, अमोल डहाळे,मुकेश टाक,श्रीकांत डहाळे,प्रसाद डहाळे,प्रकाश टाक,ओम उदावंत,आकाश डहाळे,महेश टाक,श्याम उदावंत,सचिन दहिवाळ यांच्यासह समस्त सोनार समाज बांधवांनी परिश्रम घेतले